भारताची आद्य स्वातंत्र्य सेनानी
राणी अब्बक्का

लेखक: महेंद्र माणिकचंद सुंदेचा (मुथ्था)

राणी अब्बक्का यांच्या ५०१ व्या जयंती वर्षानिमित्त
राणी अब्बक्का फौंडेशन, पुणे तसेच सरहद द्वारा प्रकाशित

भारताची आद्य स्वातंत्र्य सेनानी
राणी अब्बक्का

महेंद्र माणिकचंद सुंदेचा (मुथ्था)

प्रथम आवृत्ती: १ मे, २०२६.

: प्रकाशक–मुद्रक :

राणी अब्बक्का फौंडेशन, पुणे तसेच सरहद द्वारा प्रकाशित

ओम गुरुदत्त हौ. सोसायटी,स. नं. ११ ए,
चव्हाणनगर, धनकवडी, पुणे – ४११०४३.

Website : www.chinarpublishers.com
E-mail : chinarpublishers@gmail.com

: मुखपृष्ठ – रंगचित्रे :

रूपेश माने

: रेखांकने :

संतोष घोंगडे, अनिल रंगारी

: मुद्रण स्थळ :

कुणाल डी आर्टस्
१७२, त्र्यंबकेश्वर अपार्टमेंट, शनिवार पेठ, पुणे – ३०.

ISBN - 978-81-986171-6-3

: अक्षर जुळवणी :

सौ. रेणुका साळुंके

मूल्य: ५००/– रुपये

अनुक्रमणिका

१. उल्लाळ आणि चौटा घराणे ०७

२. कालिकतचा झामोरिन आणि वास्को द गामा १५

३. राणी अब्बक्काचे राज्यारोहण २१

४. पोर्तुगीजांना दुसरा धडा २८

५. पोर्तुगीजांचा उल्लाळवर हल्ला ३५

६. ...पुन्हा हल्ला! ४३

७. उल्लाळवरचा भीषण हल्ला ४८

८. मंगलोरवर हल्ला...पोर्तुगीजांचे पलायन ५७

९. विश्वासघात, वेढा आणि अब्बक्का राणीची कैद ६४

लेखकाचे मनोगत

खरे तर माझे शिक्षण बी. ए. हिंदी विशेष हा विषय घेऊन झालेले, व्यापार उदिम करणे आणि जमेल तितके जैन धर्माचे आचरण करणे, याचे माझ्यावर संस्कार झालेले. राणी अब्बक्का ही स्वातंत्र्यलढ्यातील पहिली महिला राणी असल्याचे मी कधीतरी वाचले होते आणि ती जैन धर्मीय होती, असाही उल्लेख वाचला होता. ती जैन आहे किंवा कोठल्या जातिधर्माची आहे म्हणून नाही, पण तिने देशासाठी केलेल्या बलिदानाने मी त्यावेळी भारावून गेलो होतो. जैनधर्मिय राणीने देशासाठी केलेले बलिदान माझ्यासाठी प्रेरणादायी ठरले. नंतर सामाजिक कामाची गोडी लागल्यावर तरुणींनी स्वत:चे संरक्षण करावे यासाठी मी पुण्यात अब्बक्काच्याच नावाने स्व-संरक्षण प्रशिक्षण शिबिरे सुरू केली.

पण तिचे कोठलेही चरित्र मराठीतच काय, तर इतर भाषांतही उपलब्ध नव्हते. या महान राणीचा जन्म १५२५ मध्ये झाला. यंदाचे वर्ष त्यांच्या जयंतीचे ५०१ वे वर्ष आहे. त्यांच्या सन्मानार्थ यापूर्वी भारत सरकारने पोस्टाचे तिकीट काढले आहे. या जयंती वर्षाच्या निमित्ताने त्याच्या जीवनगाथेवर एक छोटेसे पुस्तक करावे, असे मला वाटले. ते लिहिण्यासाठी मी पुढाकार घेतला आणि यासाठी संजय सोनवणी यांना मार्गदर्शनासाठी विनंती केली. त्यांनी माझ्या तोडक्या-मोडक्या शब्दांना आकार दिला, दिशा दिली आणि आपण लिहिलेल्या इतिहासाला पुराव्यांचा आणि खरेपणाचा आधार असला पाहिजे, असा आग्रह धरला. म्हणूनच या पुस्तकाचे लेखक म्हणून माझे नाव असले, तरी खरे श्रेय संजय सोनवणी सरांचेच आहे. जैन धर्माविषयीचा त्यांचा अभ्यास अगाध आहे. हा माझा इतिहासलेखनाचा पहिलाच प्रयत्न असला, तरी मी या पुस्तकात इतिहास लेखनाची शिस्त त्यामुळे सांभाळू शकलो.

दुर्दैवाने राणी अब्बक्का चौटा हिच्या जीवनाविषयी समकालीन देशी लेखी साधने अत्यल्प प्रमाणात उपलब्ध आहेत. तिच्याबद्दलची माहिती पोर्तुगीज दस्तऐवज, अरबी व इटालियन उल्लेख, पुढील काळातील इतिहासलेखन, तसेच तुळुनाडूतील लोकपरंपरा, यक्षगान आणि मौखिक स्मृती यांतून विविध स्वरूपांत जतन झालेली दिसते. त्यामुळे तिच्या चरित्रातील काही घटना, व्यक्तींची नावे, कालानुक्रम आणि लढायांचे तपशील हे दुर्दैवाने सर्वत्र एकसारखे किंवा निर्विवाद स्वरूपात उपलब्ध नाहीत.

या ग्रंथात जिथे प्रमाणित इतिहास उपलब्ध आहे, तिथे त्याचा आधार घेतला आहे आणि जिथे इतिहास मौन बाळगतो किंवा केवळ घटना-सूत्र देतो, तिथे त्या काळाच्या राजकीय, सामाजिक आणि सामरिक वास्तवाशी सुसंगत अशी कल्पनारूप पुनर्रचना करण्यात आली आहे. म्हणून या ग्रंथाकडे विश्वासार्ह म्हणून पाहावे. लोकपरंपरेत जिवंत राहिलेल्या कथांनाही येथे मान दिला आहे; परंतु त्या सर्वच बाबी समकालीन पुराव्यांनी निर्विवाद सिद्ध झालेल्या आहेत, असा दावा मी करीत नाही, मात्र तीर्थंकर महावीरांच्या अनेकांतवादाच्या सिद्धांताप्रमाणे सत्याच्या अनेक बाजू असतात. त्या जास्तीत जास्त घेण्याचा प्रयत्न या पुस्तकात झाला आहे.

या पुस्तकातून मिळालेले उत्पन्न राणी अब्बक्का फाउंडेशनसाठी वापरण्यात येणार आहे. भविष्यात राणी अब्बक्का फाउंडेशनच्या माध्यमातून देशभर विविध उपक्रम राबवण्यात येणार आहेत. त्यापैकीच हा एक उपक्रम आहे.

दि. १ मे, २०२६ **महेंद्र माणिकचंद सुंदेचा (मुथ्था)**

१. उल्लाळ आणि चौटा घराणे

भारत देश अत्यंत भाग्यशाली देश आहे. या देशाला समर्थ करण्यात अनेक महामानवांनी, तसेच महान स्त्रियांनीही मोलाचा हातभार लावलेला आहे. महापुरुषांचा इतिहास आम्हाला बऱ्यापैकी माहीत असला तरी या देशातील तितक्याच तोलामोलाच्या, मुत्सद्दी, प्रजाहितदक्ष आणि परकीय सत्तांशी अविरत झुंज घेणाऱ्या महिलांबद्दल मात्र तितकीशी माहिती नसते. सोळाव्या शतकात दक्षिण भारतात होऊन गेलेल्या महान अब्बक्का महादेवी यांचा इतिहास सहसा कोणाला माहीत नसावा, यात मग काही आश्चर्य वाटत नाही; परंतु आता अब्बक्काबद्दल बरीच माहिती उजेडात येत असून, आजच्या पिढीला मात्र तिचा जाज्वल्य इतिहास माहीत असला पाहिजे.

खरे म्हणजे, परकीय सत्तांशी झुंज घेणारी ही भारतातील आद्य स्वातंत्र्यसेनानी. तीही जैनधर्मीय असावी, हे अधिकच विशेष. भारतीय आरमाराची शक्ती जगाला दाखवून

देणारी पहिली नाविक युद्ध लढणारी सेनानी. परकीय शक्तींना साथ देतो म्हणून प्रत्यक्ष आपल्या पतीशीही युद्ध करणारी तत्त्वनिष्ठ वीरांगना. अब्बक्काची थोरवी येथेच संपत नाही, तर ती प्रजाहितदक्ष, न्यायप्रिय आणि अत्यंत सहिष्णू होती. स्वत: जैनधर्मीय असूनही तिने हिंदू, मुस्लीम आणि राज्यातील आदिवासी जमातींना समान मानत सर्वांच्या आर्थिक उत्थानासाठी अविरत प्रयत्न केले. त्यामुळे दक्षिण कर्नाटकात तिची कीर्ती आजही टिकून आहे.

पूर्वी अब्बक्का राणीबद्दल जगाला फारशी माहिती नसली, तरी कर्नाटक व केरळमधील अनेक लोककथांचा ती भाग बनली होती. पारंपरिक यक्षगानातून तिचा इतिहास लोकांनी जिवंत ठेवला होता. नवीन संशोधनातून तिच्याबद्दल बरीच ऐतिहासिक माहिती उजेडात येऊ लागली आहे. तरीही लोकपरंपरांनी जी माहिती जपून ठेवलेली आहे, तीही तिच्या इतिहासातील महत्त्वाचा भाग आहे. लोकांनी पूजा बांधावी, असे हे अलौकिक व्यक्तिमत्त्व.

तिने बलाढ्य पोर्तुगीज आरमाराविरुद्ध गाजवलेल्या पराक्रमांची दखल घेऊन भारताच्या तटरक्षकदलाने खाड्यांच्या सुरक्षेसाठी तयार करण्यात आलेल्या पहिल्या पाच

जहाजांपैकी पहिल्या जहाजाचे नाव ‘राणी अब्बक्का’ असे ठेवले आहे. कर्नाटकमध्ये आता दरवर्षी राणी अब्बक्का उत्सव साजरा होतो. अब्बक्का राणीच्या नावाने एक वस्तूसंग्रहालय सुरू करण्यात आले आहे. तसेच तुळू भाषेच्या अभ्यासासाठी ‘राणी अब्बक्का तुळू अध्ययन केंद्र’ सुरू करण्यात आले आहे. तिच्या नावाने पारितोषिके आणि शिष्यवृत्त्याही दिल्या जातात.

भारत सरकारने तिच्या सन्मानार्थ पोस्टाचे तिकीटही जारी केलेले आहे. उल्लाळ व बेंगळूरू येथे अब्बक्का राणीचे भव्य पुतळेही उभारण्यात आले आहेत. या पुस्तकात आपण या महान राणीचा इतिहास जाणून घेणार आहोत.

उल्लाळ आणि चौटा घराणे

उल्लाळ हे दक्षिण कर्नाटकात अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर वसलेले एक प्राचीन शहर आहे. येथे प्राचीन बंदरही असून येथून अरबस्तान, जावा, सुमात्रा, चीन या दूरदेशांशी समुद्रमार्गे मोठा व्यापार चालत असे. या भागातील भाषा ही द्रविड भाषाशाखेतील तुळू असल्याने या प्रदेशाला ‘तुळूनाडू’ हे नाव प्रचलित होते. या भागात अनेक पराक्रमी जमातींचे लोक स्थानिक शासनकर्ते होते. ते लोक मुळात स्वतंत्रतावादी असल्याने कोणाही साम्राज्याच्या सर्वस्वी अंकित कधीच राहिले नाहीत.

भारतीय मसाल्यांना जगभर मागणी असल्याने येथून मसाल्यांची निर्यात मोठ्या प्रमाणावर केली जात असे. कर्नाटक ते केरळपर्यंतची किनारपट्टी अशा अनेक बंदरांनी गजबजलेली होती. या किनारपट्टीवर अनेक सत्ता राज्य करत असल्या, तरी चौटा घराण्याची मात्र उल्लाळ व आसपासच्या किनारपट्टीवर सत्ता होती. पुत्तीगे ही त्यांची मुख्य राजधानी असली, तरी या घराण्याचा राज्यकारभार उल्लाळ येथूनच चालत असे. कर्नाटकातील दक्षिण कॅनरा व उडपी आणि केरळमधील कासारगोड हे जिल्हे या चौटा मातृसत्ताक राज्यात मोडत असत.

या भागात मसाल्यांचे, सुपारी-नारळाचे, कापड आणि जहाज बांधणीसाठी उपयुक्त लाकडांचे उत्पादन होत असे. जगभर या मालाची मागणी असल्याने उल्लाळ राज्य

छोटे असले, तरी आर्थिकदृष्ट्या भरभराटीला आलेले होते.

या प्रदेशात जैन धर्माचे आगमन इसवी सन पूर्व ३०० च्या आसपासच झालेले असल्याने स्वाभाविक जैन धर्मियांचे मोठे प्राबल्य होते. चौटा घराणेही जैन धर्माचे होते. यांच्या कारकिर्दीत जैन धर्माला या भागात मोठे सामर्थ्य प्राप्त झाले. या भागात अजूनही प्राचीन जैन मंदिरे असून त्यांना 'बासडी' असे म्हणतात.

हे घराणे जैनधर्मीय असले तरी, ते सहिष्णू प्रवृत्तीचे असल्यामुळे शिव आणि अन्य स्थानिक लोकदेवतांनाही मानत होते. आपल्या प्रजेवर धार्मिक भेदभाव न करता सलोख्याच्या दृष्टीने राज्य करणे, हे तत्व या घराण्याने पाळले. समुद्रकिनाऱ्यावरचे हे राज्य असल्याने प्रशासनात कोळी समाजाचाही सहभाग तर होताच; पण दक्षिणेत मुस्लीम धर्मानेही पाळेमुळे रुजवली असल्याने मुस्लीम समाजाचाही सैन्य व प्रशासनात सहभाग होता.

चौटा हे घराण्याचे नाव सौराष्ट्रामधील चावडा घराण्यापासून आले असावे, असे मत काही इतिहासकार व्यक्त करतात. चावडापैकी काही लोक स्थलांतर करून दक्षिण कर्नाटकातील समुद्रकिनाऱ्यावर येऊन वसले असावेत, असा त्यांचा तर्क आहे. चावडा राजांनी सोमनाथला जसे आपले संरक्षक दैवत मानले, तसेच चौटा राजांनीही सोमेश्वरला आपले कुलदैवत मानले होते असाही तर्क या बाबतीत दिला जातो. तर अनेक विद्वानांच्या मते, हे घराणे तुळूनाडूमध्ये स्वतंत्ररीत्या जन्माला आलेले असून ते कोठूनतरी तेथे येऊन स्थायिक झाले. हे मत आनुवांशिक पुराव्यावर टिकत नाही. विद्वानांची मते अशी परस्परविरोधी आहेत, मात्र, याची कारणे म्हणजे प्रत्येक राजवंशाची पाळेमुळे कोठेतरी अन्यत्र शोधण्याची विद्वानांची प्रवृत्ती.

या संदर्भात पु. ग. सहस्त्रबुद्धे म्हणतात, (कोणाचेही स्थान निश्चय करताना) हे राजवंश मुळात कोठून आले, त्यांचे अगदी प्राचीन पूर्वज कोणत्या वर्णाचे होते ही चिकित्सा पंडित करतात. ऐतिहासिक जिज्ञासेच्या दृष्टीने व इतिहासलेखनाच्या परिपूर्तीसाठी हा शोध करणे अवश्य आहे; पण एकतर ही चिकित्सा बव्हंशी निष्फळ होते. कोणत्याही घराण्याच्या मूलस्थानाविषयी निश्चित असा पुरावा अद्याप उपलब्ध झालेला नाही आणि येथून पुढे होण्याची फारशी आशा नाही. शिवाय ऐश्वर्यप्राप्ती

झाल्यानंतर आपल्या घराण्याचा संबंध चंद्र, सूर्य या प्राचीन वंशांशी जोडून देण्याची प्रत्येक राजघराण्याची प्रवृत्ती असल्यामुळे शिलालेख किंवा ताम्रपट यांचा पुरावाही या दृष्टीने विश्वसनीय मानता येत नाही. चालुक्य आपल्याला कधी चंद्रवंशीय, तर कधी सूर्यवंशीयही म्हणवितात. राष्ट्रकूट यदुवंशी म्हणवून कधी श्रीकृष्ण, तर कधी सात्यकी हा आपला मूळपुरुष असे सांगतात. यामुळे अर्थातच मथुरा, अयोध्या ही त्यांची मूळस्थाने ठरतात. या विधानांना इतिहासात स्थान देणे कठीण आहे.

थोडक्यात, चौटा घराणे मूळचे कोठले यासंदर्भात इतिहासात फार डोकावत बसणे तथ्यपूर्ण असेलच,असे नाही.

ते सत्य काहीही असले, तरी या घराण्याने इसवी सन ११६० ते १८६७ या काळात या भागात तब्बल ७०० वर्षं राज्य केले. बाराव्या शतकात चौटा घराणे राज्यावर येण्याअगोदर या भागावर होयसळ घराण्यातील विष्णूवर्धन या राजाचे राज्य होते. होयसळ घराण्याची सत्ता येण्याच्या आधीही येथे चौटांच्या पूर्वजांचेच राज्य होते, असे इतिहासकार मानतात. फार तर ते होयसळ काळात मांडलिक म्हणून राज्य करत असतील. होयसळ सत्ता संपल्यानंतर चौटा घराण्याने पुन्हा आपली सार्वभौम सत्ता सुरू केली, असे एकंदरीत इतिहासावरून दिसते.

होयसळ घराण्याच्या विष्णूवर्धनाच्या मृत्यूनंतर इसवी सन ११६० मध्ये तिरूमल राया (पहिला) याने हे राज्य परत मिळवले, आणि या भागावर चौटांची सत्ता पुन्हा स्थापन झाली. तिरूमल राया आधी उल्लाळजवळील सोमेश्वर या गावातून राज्यकारभार करत असे. सोमेश्वर या गावाचे ग्रामदैवत सोमनाथ हे होते. त्यामुळे या राजाने जैन धर्मीय असूनही हे ग्रामदैवत आपले कुलदैवत म्हणून स्वीकारले आणि प्रजेच्या धर्मभावनांचेही भान राखले तसेच आपल्या सहिष्णू प्रवृत्तीचेही दर्शन घडवले. त्यामुळे हे घराणे सर्व धर्मियांमध्ये आदराचे स्थान प्राप्त करून बसले असल्यास नवल नाही.

तिरूमल राया (पहिला) हा ११७९ मध्ये मरण पावला. त्याच्यानंतर त्याचा जावई चेन्नराया (पहिला) हा गादीवर आला. याने आपली राजधानी पुत्तीगे येथे हलवली होती, तर उल्लाळ शहर आणि बंदर हे दुय्यम राजधानी होते. चेन्नरायाचा जावई वरदैया हा अतिशय हुशार प्रशासक आणि पराक्रमी सेनापती होता. तो महत्त्वाकांक्षी होता. त्याने

तेराव्या शतकात राज्याचा विस्तार करण्यासाठी खास सैन्य उभे करायला सुरवात केली. त्याची ही युद्धाची तयारी पाहून आपल्या राज्यावरच स्वारी होणार आहे, याची शंका येऊन शेजारच्या वीर बल्लाळ राजाने आधीच चौटांच्या राज्यावर आक्रमण केले.

वीर बल्लाळ (तिसरा) हा होयसळ घराण्याचा शेवटचा राजा मानला जातो. त्याच्या कारकिर्दीत होयसळ साम्राज्याला उतरती कळा लागली असली तरी हा राजा मात्र पराक्रमी होता. त्याने उत्तरेतून होणाऱ्या तुर्क आक्रमणांनाही तोंड दिले होते. तो एक महान शासक म्हणूनही प्रसिद्ध होता. आपल्या राज्यातून विभक्त झालेल्या उल्लाळ राज्याने आपल्यावर स्वारी करू नये म्हणून त्याने आधीच आक्रमक धोरण स्वीकारले.

या लढाईत वरदैयाने वीर बल्लाळ राजाचा पराभव केला व त्याच्या राज्यांपैकी बराच भाग आपल्या चौटा राज्याला जोडून टाकला. या विजयाने आणखी बळ येऊन वरदैय्याने शेजारच्या दोन छोट्या राज्यांवर आक्रमण करून ती जिंकली व चौटा राज्याला जोडून टाकली. त्याच वेळी आता आपली पाळी आहे, हे ओळखून मूडबिद्री येथील मिजारा राजा चेन्नाप्पा याने चौटा राज्यावर आक्रमण करायचे ठरवले. चेन्नरायाला ही बातमी कळाली आणि त्याने मिजारावर मोठे आक्रमण केले. यात चेन्नाप्पाचा पराभव झाला. मूडबिद्री चौटा राज्यात आली. सोळाव्या शतकानंतर मूडबिद्री ही चौटा राज्याची राजधानी बनवण्यात आली. या राज्यातील बहुसंख्य लोक हे जैनधर्मी होते. येथे आजही असंख्य जैन मंदिरे (बासडी) पहायला मिळतात. उल्लेखनीय बाब म्हणजे, यातील अठरा प्राचीन मंदिरे चौटा घराण्याच्या कारकिर्दीत बांधली गेलेली आहेत.

अशा रीतीने चेन्नराया (पहिला) याच्या काळात त्याने आणि त्याचा जावई वरदैया याने बराच राज्यविस्तार केला. राज्याचा विस्तार केल्यावर चेन्नराया पहिला याने प्रशासन, महसूल, संरक्षण व्यवस्था यांत बऱ्याच सुधारणा केल्या. राज्याची संरक्षण व्यवस्था मजबूत करण्यासाठी त्याने एक विशेष आदेश काढला. त्या आदेशानुसार त्याने युद्धाच्या काळात राज्यातील प्रत्येक घरातून एक पुरुष सैन्यात भरती होणे सक्तीचे केले. पुढे चौटा राज्याचे विभाजन होऊन एका भागाची राजधानी उल्लाळ, तर दुसऱ्या भागाची राजधानी पुत्तीगे ही राहिली.

तुळूनाडूमधील बव्हंशी सामाजिक प्रथा मातृसत्ताक होती. काही जमाती

पितृसत्ताक पद्धतीचेही पालन करत असत. पितृसत्ताक पद्धतीला ‘मन्गना संताना’ म्हटले जायचे, तर मातृसत्ताक पद्धतीला ‘आलिया संताना’ म्हणून ओळखले जायचे. या प्रदेशात बव्हंशी स्थानिक लोक बंट आणि बिल्लावस जमातीतून आलेले होते. चौटा घराणे बंट समाजातून आलेले होते. हे घराणे मातृसत्ताक पद्धतीचे पालन करणारे तर होतेच, पण हा समाज लढवय्या समाज म्हणून ओळखला जात असे.

मातृसत्ताक पद्धतीचे वैशिष्ट्य म्हणजे, वारसा हा मुलीच्या बाजूने जात असे, मुलांच्या नाही.

चौटा घराण्याच्या सातशे वर्षांच्या इतिहासात एकूण २० व्यक्तींनी राज्य केले. मातृसत्ताक असल्याने, या घराण्यात राजाचा मुलगा हा राज्याचा वारसदार होत नसे, तर मुलीचा पती, मुलगी, सून, भाचा, भाची यांच्यापैकी कोणीतरी राज्याचा वारसदार होत असे. सून ही सहसा भाची असे, कारण या भागात मामाच्या मुलीशी लग्न करण्याची पद्धत होती, अजूनही आहे. चौटा घराण्यात गादीवर आलेल्या २० व्यक्तींपैकी ११ जण राजे, तर ९ राण्या होत्या. या नऊ राण्या त्यांच्या आधी गादीवर असणाऱ्यांच्या एकतर मुली होत्या, किंवा सून झालेल्या भाच्या होत्या.

सोळाव्या शतकापर्यंत चौटा घराण्याची सत्ता बऱ्यापैकी विस्तारलेली होती; परंतु राणी अब्बक्काच्या जन्माच्या वेळेसच दक्षिण भारतावर पोर्तुगीजांच्या रूपाने मोठे संकट चालून आलेले होते. केवळ व्यापार करणे हे त्यांचे उद्दिष्ट नव्हते, तर सत्ताकेंद्र बनवल्यातही त्यांना रस होता. त्यासाठी ते क्रौर्याच्या सीमा पार करू शकत. बरे, त्यांची युद्धपद्धतीही पारंपरिक नसून आधुनिक होती. त्यांची जहाजेही तुलनेने भव्य आणि युद्धासाठी सज्ज केलेली होती. भारतातील व्यापारावर मक्तेदारी स्थापन करणे, हे त्यांचे उद्दिष्ट असल्याने अरब आणि देशी व्यापारी त्यांचे साहजिकच शत्रू होते.

वास्को द गामाने १४९८ मध्ये कालिकतच्या बंदरावर पाऊल ठेवले, तेव्हापासूनच हा संघर्ष सुरू झाला. एरवी शांततेने व्यापार करणारी किनारपट्टी आक्रमकतेने अशांत झाली. या वातावरणाला तोंड देण्यासाठी एक महिला शक्ती उल्लाळ राज्यात जन्माला आली होती, तिचेच नाव ‘अब्बक्का महादेवी’. तिने आपल्या अतुलनीय पराक्रमाने पोर्तुगीजांच्या बलाढ्य आरमाराला सागराचा तळ दाखवला. देशी

शत्रूच नव्हे तर आपल्या विश्वासघातकी पतीशीही तिला युद्ध करावे लागले.

तिच्याच काळात अब्बक्का पराक्रमामुळे नुसती भारतातच नव्हे, तर युरोप आणि अरबी जगातही प्रसिद्ध झालेली होती. कालिकतचा झामोरीनसुद्धा तिच्या पराक्रमाने दिपून गेला होता. विदेशी प्रवासीही खास तिची भेट घेण्यासाठी येत. सोळाव्या शतकात इतकी कीर्ती कोणत्याही अन्य भारतीय राणीला मिळालेली नाही.

या देशाचे दुर्दैव की, याच भूमीचे काही स्वार्थी आणि अल्पदृष्टीचे लोक परकीय शक्तीला मिळाले आणि जी भारताची पहिली स्वातंत्र्याची उद्गाती होती, तिला मात्र गमावून बसले.

पण लोकस्मृतींनी मात्र तिला आदरांजली वाहिली. तिच्यावर यक्षगानसारखे भावपूर्ण नृत्य-गायन केले. तिच्या अपार पराक्रमाच्या स्मृती जपल्या. आपण टिपू सुलतानाला रॉकेटचा जनक मानतो, पण त्याच्याही पूर्वी काही शतके आधी तिने आगळ्या धर्तीचे अग्निबाण शोधले आणि पोर्तुगीज जहाजे भस्मसात करण्यासाठी वापरले.

सोळाव्या शतकात पोर्तुगीजांना तोंड देऊ शकेल, असे आरमार स्थापन करणारी पहिली भारतीय महिला हीच.

लिखित इतिहासाने तिची माहिती फारशी जपलेली नसली, तरी अरबी, पोर्तुगीज आणि इटालियन साधनांनी तिची बरीच माहिती जपलेली आहे. बव्हंशी देशी माहिती मात्र लोक परंपरांमधून मिळते आणि हीच साधने या इतिहासाचाही मुख्य आधार आहेत.

राणी अब्बक्का महादेवीच्या इतिहासात प्रवेश करण्याआधी भारतात पोर्तुगीज आले कधी, कसे आणि त्यांनी भारतीय भूमीवर काय उत्पात घडवला, हे पाहणे महत्वाचे आहे. त्याखेरीज अब्बक्काचे माहात्म्य आमच्या लक्षात येणार नाही.

***

२. कालिकतचा झामोरिन आणि वास्को द गामा

(कालिकत बंदर, सोळावे शतक)

झामोरिन हे नाव वरकरणी विदेशी वाटते; कारण या नावाचा अर्थ किंवा त्याची व्युत्पत्तीही सहसा वाचकांना माहीत नसते. वस्तुत: हे व्यक्तीचे नाव नसून, हिंदू नायर राजांनी वापरलेली पदवी आहे.

मल्याळी भाषेतील हा मूळचा शब्द सामुथिरी कवा सामुरी असा आहे. या शब्दाचा अर्थ, समुद्राचा स्वामी आणि सर्वोच्च सम्राट असा होतो.

पोर्तुगीज लोकांनी या शब्दाचे उच्चार आधी सामोरिम असा करून पुढे तो शब्द झामोरिन म्हणून रूढ झाला. चौदाव्या शतकातील इब्न बतुता या इतिहासकारानेही झामोरिन हेच नाव वापरलेले आहे. आजही हेच नाव इतिहासात लोकप्रिय आहे. यात महत्वाची बाब म्हणजे बहुतेक राजांनी 'सामुथिरी'' अथवा सामुरी हीच पदवी वापरली असून केवळ तीनेक राजांचे व्यक्तिगत नाव इतिहासाला माहीत आहे. कालिकत येथून या

घराण्याने जवळपास सहाशे वर्ष राज्यकारभार केला.

केरळच्या किनाऱ्यावरील महत्वाची कोची, क्विलोन, कन्नूर आणि कालिकत यांसारखी महत्त्वाची सर्व बंदरे यांच्या नियंत्रणाखाली होती. यांच्या उत्पन्नाचा महत्त्वाचा स्रोत म्हणजे बंदरांतून वाहतूक केल्या जाणाऱ्या मालांवरील कर. कालिकत शहर त्या काळात मसाल्यांचे शहर म्हणून ओळखले जात होते. तेथे चीनपासून ते अरबस्तानातले व्यापारी येत असत. कालिकत बंदर तसे अडचणीच्या ठिकाणी वसलेले असले, तरी आपल्या आर्थिक धोरणामुळे झामोरिनांनी राज्यात समृद्धी आणली.

झामोरिन हे नायर समाजातील एराडी शाखेतून आलेले होते. ते स्वत:ला नायर लोकांपेक्षाही श्रेष्ठ समजत असत. झामोरिनही मातृसत्ताक पद्धतीचे अवलंबन करत असत. त्यामुळे वर्तमान राजाच्या बहिणीचा मुलगाच पुढील सत्ताधारी बनत असे.

विजयनगर साम्राज्याच्या आरंभ काळातच म्हणजे १४२६मध्ये कालिकतचे झामोरिन देवराया (दुसरा) याचे मांडलिक बनले होते; पण जसा १४९८ मध्ये विजयनगर साम्राज्याचा अस्त झाला, कालिकतचे राज्य पुन्हा सार्वभौम बनले आणि याच वर्षी पोर्तुगीज दर्यावर्दी वास्को द गामाने आपली जहाजे कालिकत बंदरापर्यंत पोहोचवली. वास्को द गामा हा एक प्रसिद्ध पोर्तुगीज दर्यावर्दी होता. त्याने १४९८ मध्ये आफ्रिकेच्या दक्षिण टोकावरून (केप ऑफ गुड होप) वळसा घेत भारतापर्यंत पोहोचण्याचा थेट सागरी मार्ग शोधला.

तत्कालीन युरोपमध्ये भारताबद्दलचे ज्ञान ऐकीव व बरेचसे दंतकथात्मक होते. वास्को द गामापूर्वी कोलंबसनेही भारताचा शोध घ्यायचा प्रयत्न केला होता; पण त्याला सापडली होती अमेरिका. वास्को द गामाने मात्र भारताला शोधण्यासाठी वेगळा मार्ग वापरला. त्याने भूमध्य सागरातून आपली जहाजे हाकारली. आफ्रिकेच्या किनाऱ्याने जात, मुस्लीम दर्यावर्दीशी संघर्ष करत त्याने आफ्रिकेला केप ऑफ गुड होप येथे वळसा घातला. मालदीवच्या इब्न मज्जीद या अनुभवी दर्यावर्द्याने त्याला पुढचे मार्गदर्शन केले आणि कालिकत येथे पोहोचवले.

२० मे १४९८ रोजी कालिकत येथे पोहोचून त्याने युरोप आणि आशियातील व्यापाराचे नवीन युग सुरू केले. झामोरिनने त्याचे स्वागत केले. त्याने व्यापारासाठी आणलेला माल निकृष्ट दर्जाचा असूनही त्याला व्यापारासाठी परवानगी दिली. पण

‘आपण आणलेल्या मालाच्या मोबदल्यात मसाल्यांसारखे पदार्थ द्या,’ ही मागणी मात्र झामोरिनने फेटाळून लावली. ‘मसाले घ्यायचेच असतील’ तर ते सोने किंवा चांदीच्या बदल्यातच मिळतील आणि वर करही भरावा लागेल,’ असे झामोरिनने स्पष्ट सांगितले. यामुळे काही प्रमाणात तणाव निर्माण झाला आणि वास्को द गामाला पदरात काही विशेष न पडता परत फिरावे लागले.

पण या पहिल्या भेटीपासून आशिया खंडाच्या इतिहासाला वेगळे वळण लागले. आजवर भारताचा अरबी, चिनी किंवा दक्षिण-पूर्व आशियाशी व्यापार चालू असला, तरी त्यातील कोणीही वसाहतवादी नव्हते. पण पोर्तुगीजांची धोरणे वसाहतवादी होते; त्यांनी अत्यंत आक्रमकतेने मध्यपूर्वेतील अरबांच्या हातात असलेल्या मसाल्याच्या

(वास्को द गामा आणि झामोरिन भेट)

व्यापारावर आपले वर्चस्व स्थापन करायला सुरुवात केली. कालिकत येथे स्थापन करण्यात आलेली पोर्तुगिजांची वसाहत आक्रमक वृत्तीची होती.

या यशाने प्रेरित होऊन, वास्को द गामा इसवी सन १५०२ मध्ये १५ जहाजे आणि ८०० सैनिकांसह पुन्हा एकदा भारताच्या भेटीवर आला. पाठोपाठ पोर्तुगीजांचे आणखी

अनेक नौदल ताफे भारताच्या पश्चिम किनारपट्टीला भेट देऊ लागले. कालांतराने पोर्तुगीजांनी किनारपट्टीवरील काही भूभाग काबीज केला आणि पश्चिम किनारपट्टीवर चार किल्ले उभारले. हाच भारतात पोर्तुगीज सत्तेचा पाया ठरला.

वास्को द गामा पाठोपाठ भारतात अल्बुकर्क आणि अल्मिडा १५०५ सालानंतर आले आणि यांनीच भारतात मोठ्या प्रमाणावर वसाहती वसवण्याचे काम आपल्या अंगावर घेतले.

यातील अल्बूकर्क हा १५०९-१५१५ या काळात भारतातील पोर्तुगीज वसाहतींचा व्हाइसरॉय होता. हा अत्यंत महत्त्वाकांक्षी होता. त्याने १५१०मध्ये विजापूरच्या सुलतानाकडून गोवा जिंकून घेतले आणि पोर्तुगीज सत्तेचा भारतात विस्तार केला तसेच गोव्याला भारतातील पोर्तुगीज सत्तेचे प्रमुख केंद्र बनवले.

अल्बुकर्कने भारतातील जिंकलेल्या प्रदेशात मुलकी प्रशासन व्यवस्था सुरू केली. त्याने त्याच्या ताब्यातील खेड्यांना नागरी सुविधांसंबंधी धोरण राबविण्याचे स्वातंत्र्य दिले. महसूल गोळा करणे आणि फौजदारी खटले चालविण्यासाठी त्याने पोर्तुगीज अधिकारी नेमले. धर्मांतरेही याने मोठ्या प्रमाणात सुरु केली.

आधी पोर्तुगीजांच्या विस्तारवादाचा अंदाज न आलेल्या झामोरिनने त्यांचे स्वागतच केले. त्यांना मसाल्यांचा व्यापार करायलाही परवानगी दिली. झामोरिनला

व्यापारात रस होता. चीनच्या दरबाराशीही त्याचे चांगले संबंध होते. व्यापारी फक्त व्यापारच करत. हा त्या काळाचा साधारणपणे पाळला जाणारा नियम होता. पण या युरोपीय व्यापाऱ्यांचे हेतू व्यापारापार जाणारे होते, हे आधी झामोरिनच्या लक्षातच आले नाही.

काही काळ जाताच पोर्तुगीजांनी आपले दात दाखवायला सुरुवात केली. त्यांनी झामोरिन आणि अरब व्यापाऱ्यांशी नुसती स्पर्धाच नव्हे, तर आक्रमक मक्तेदारी लादायला सुरुवात केली.

मसाल्यांच्या व्यापारात जागतिक मक्तेदारी स्थापन करणे, हेच एकमेव उद्दिष्ट त्यांनी ठेवलेले होते.

त्यामुळे त्यांनी विशेषकरून मसाल्याच्या व्यापारात अग्रणी असलेल्या मोपल्या व्यापाऱ्यांची जहाजे लुटायलाही सुरुवात केली. आपल्याखेरीज कोणीही आखात किंवा युरोपाशी व्यापार करू नये, अशी त्यांची असुरी इच्छा होती.

त्यांची गस्ती जहाजे केरळच्या किनाऱ्यावर फिरत असत. या किनाऱ्यावरून कोणतेही जहाज हाकारले गेले तर त्याला अडवणे आणि लुटणे, हा त्यांचा व्यापाराबरोबरच एक मुख्य पेशा बनून गेला.

याला प्रतिकार करण्यासाठी स्थानिक नाविकदल सज्ज झाले आणि श्रीलंकेपासून कोकणपर्यंत पोर्तुगिजांना विरोध करण्यास सुरुवात झाली. झामोरिनचा नौदल प्रमुख कुन्जली माराक्कर याने या लढ्याचे नेतृत्व केले. मलबार समुद्र किनाऱ्यावर पोर्तुगिजांच्या वसाहती राहता कामा नयेत, असे झामोरिनने ठरवले; पण या काळातच त्यांनी अनेक सागरी किल्ले व वखारी बांधल्या होत्या. त्यामुळे त्यांचे बळ वाढलेले होते. झामोरिन आणि पोर्तुगीज संघर्ष पुढेही अनिर्णायक स्थितीत सुरूच राहिला. पुढे झामोरिनने उल्लाळच्या अब्बक्का राणीशीही युती केली. मग मात्र त्याला काही प्रमाणात यश मिळू लागले.

तरीही स्थानिक सत्ता पोर्तुगीजांशी सशस्त्र संघर्ष करत होत्या, पण त्यांना पुरेसे यश मिळत नव्हते. पोर्तुगीज आपली सागरी सत्ता विस्तारत आता जमिनीवरही वसाहती करू लागलेले होते. सन १५२४ मध्ये वास्को द गामाला पोर्तुगाल सरकारने पुन्हा पाठवले, ते अशांत स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी; पण त्याला फारसे यश

मिळाले नाही. शेवटी त्याचा कोची येथेच मृत्यूही झाला.

झामोरिनच्या आदेशाने मुस्लिमांनी ख्रिस्ती आणि ज्यूंवर प्राणघातक हल्ले केले. त्यामुळे पोर्तुगीजही आक्रमक झाले आणि त्यांनी अनेक बंदरांवर हल्ले करून लुटालूट केली. अनेक शहरे जाळून टाकली.

थोडक्यात, केरळ आणि कर्नाटकाची किनारपट्टी एका नव्याच रक्तरंजित संघर्षात पडली. याचा परिणाम व्यापारावर तर झालाच, पण उत्पादनावरही होऊ लागला. दारिद्याने एक प्रकारे थैमान घालायला सुरुवात केली.

पोर्तुगीजांचे अरिष्ट दूर करायला भारतीय नौसेना एकत्रित येण्याची गरज होती. त्याशिवाय या वसाहतवादाला पायबंद बसणे शक्य नव्हते आणि नेमक्या याच काळात राणी अब्बक्का महादेवी उल्लाळच्या सत्तेवर आली. या संघर्षाचे प्रखर नेतृत्व तिने केले. तिला पोर्तुगीजांना भारतातून हाकलणे शक्य झाले नसले, तरी तिने जो संघर्ष केला आणि पोर्तुगीजांवर दैदिप्यमान विजय मिळवले, त्यामुळे पोर्तुगीजांच्या मोकाट सुटलेल्या वारूला पायबंद बसायला मदत झाली.

युरोपियन आरमाराला भारतीय आरमाराच्या मदतीने परास्त करू शकलेली ही एकमेव आद्य भारतीय सेनानी.

***

३. राणी अब्बक्काचे राज्यारोहण

महान स्वातंत्र्ययोद्धा राणी अब्बक्काची नेमकी जन्मतारीख आज दुर्दैवाने माहीत नाही. एवढेच काय, पण तिच्या माता-पित्याचेही नाव इतिहासात कोठे जपले गेलेले नाही. तिच्याबद्दल माहिती मिळते, ती अनेक त्रुटीत स्रोतांतून आणि काही ठिकाणी ती परस्पर-विसंगतही आहे. तिच्या स्मृती तुळूनाडूतील जनसामान्यांनी आख्यायिका, लोककथा आणि लोकगीते यांतून मात्र कटाक्षाने जपलेल्या आहेत. हे घराणे मुळात मातृसत्ताक असल्याने आणि कदाचित तिचे माता-पिता लहानपणीच दिवंगत झालेले असल्यानेही त्यांची नावे लोकस्मृतींनी जपली नसावीत, असे फार तर म्हणता येते.

अब्बक्काचा काका तिरूमलराया (तिसरा) याने तिला एखाद्या राजकुमारीला आवश्यक अशा राजनीती, धनुर्विद्या, तलवारबाजी, घोडेस्वारी वगैरे गोष्टींमध्ये प्रशिक्षण दिले, यांबाबत मात्र इतिहासात एकमत आहे. बंट या लढवय्या समाजातून आलेली असल्याने आणि मातृसत्ताक पद्धतीने तीच राणी बनणार असल्याने तिला राणी म्हणून आवश्यक असणारे लिहिणे-वाचणे, शस्त्र चालवणे, आरमार हे त्यांच्या राज्याचा कणा असल्याने, त्याचेही प्रशिक्षण तिला दिले गेले असणार, हेही निश्चित आहे. तिने स्वत: अनेक युद्धांत स्वत: नेतृत्व तर केलेच, पण अशक्यप्राय असे विजयही मिळवले आणि तेही युरोपीय शक्तीविरुद्ध, ही तिची बेजोड कामगिरी आहे. त्याआधी कोणाही भारतीयाने युरोपियन नौदल शक्तींशी युद्धे केलेली नव्हती.

अब्बक्काचे निवासस्थान दक्षिण कर्नाटकात वसलेल्या उल्लाळ येथील समुद्रकिनारी बांधलेला किल्ला होता. हा किल्ला अत्यंत मजबूत असून पोर्तुगीजांविरुद्ध लढण्यासाठी अब्बक्काने हा किल्ला हेच आपले मुख्य केंद्र बनवले होते.

हे शहर अरबी समुद्र आणि नेत्रावती नदीच्या काठावर वसलेले आहे. आज हे बंदर सागरी लाटांनी धडका देऊन झालेल्या झिजेने अस्तित्वात राहिलेले नसून किल्ला आणि राजवाड्याचे काही अवशेषच काय ते शिल्लक आहेत.

पण मध्ययुगात मात्र हे एक महत्त्वाचे व्यापारी बंदर असून, येथून प्रामुख्याने

मसाल्यांचा व्यापार केला जात असे. उल्लाळ राज्य आकाराने छोटे असले, तरी एक प्रभावशाली राज्य होते.

अब्बक्काचा विवाह मंगलोरजवळच्या बांगेर शहरातून राज्य करणाऱ्या बंट जमातीच्याच आणि धर्माने जैन असलेल्या लक्ष्मप्पा बंगा आरासा (दुसरा) याच्याशी झाला होता. हा उल्लाळच्या घराण्याचा जवळचा नातलग होता. बंगा आरासा या घराण्याच्या राजाचे विशेष अभिधान होते. झामोरिन या उपाधीसारखीच 'बंगा आरासा' हीसुद्धा एक उपाधी होती. बंगांची राजधानी म्हणून 'बांगेर' हे नाव त्या शहराचे पडलेले होते.

बंगा राज्यात असलेले मंगलोर हे शहरसुद्धा समुद्रकिनाऱ्यावर असून, तेथेही ऐतिहासिक बंदर होते. हे घराणे कर्नाटकातील प्राचीन राजवंश अलुप्पा घराण्याशी आपली नाळ जोडत असे. हे घराणे तेराव्या शतकात अस्तित्वात आले आणि इंग्रजांनी बरखास्त करेपर्यंत प्रभावी राहिले. लक्ष्मप्पा बंगा आरासा आणि स्वतंत्र प्रवृत्तीच्या

अब्बक्कामधील वैवाहिक संबंध मात्र सुखाचे झाले नाहीत.

लग्न झाल्यानंतर काहीच वर्षांत लक्ष्मप्पा आणि अब्बक्कात दुरावा निर्माण व्हायला सुरुवात झाली आणि याचे कारण घडले पोर्तुगीज!

कालिकतला पाय रोवल्यानंतर पोर्तुगीजांनी कोचीपासून ते गोव्यापर्यंतची बंदरे आपल्या नियंत्रणाखाली आणायला सुरुवात केली होती. भारतातून निर्यात होणारा प्रत्येक माल हा पोर्तुगीजांच्या मार्फतच निर्यात केला जाईल, अशा स्वरूपाची दडपशाही त्यांनी सुरू केली होती. किनारपट्टीवरील छोट्या मोठ्या सत्तांना आपल्या अंकित करण्याची व त्यांच्याकडून व्यापाराच्या बेसुमार सवलती मिळण्याची त्यांची आकांक्षा होती. सुरुवातीला अब्बक्काने विरोध केल्याने लक्ष्मप्पाने पोर्तुगीजांच्या दबावाला बळी पडण्याचे नाकारले.

पण पोर्तुगिजांनी त्यांचे प्रयत्न सोडले नाही. मंगलोर बंदरालाही त्यांनी घेरून पाहिले, पण अब्बक्काने कठोर धोरण राबवल्याने पोर्तुगीजांचा हाही मार्ग अयशस्वी ठरला. मात्र पोर्तुगीज अत्यंत चिवट होते. त्यांनी लक्ष्मप्पाला अखेर दबावाखाली घेत व्यापारात अनेक सवलती मिळवल्या. एवढेच नव्हे तर, लक्ष्मप्पाला नजराणाही द्यायला भाग पाडले.

अब्बक्काने या प्रकाराला कडवा विरोध केला. आपल्या राणीनेच अशा प्रकारे बंडाचा झेंडा फडकवल्यामुळे लक्ष्मप्पाही इरेला पडला आणि त्याने पोर्तुगीजांशी आपली मैत्री कायम करण्याचा निश्चय केला. अब्बक्काला यातील धोका समजत होता. किनारपट्टीवरील राज्ये जर अशी नांगी टाकू लागली तर देशावर पोर्तुगीज सत्ता यायला वेळ लागणार नाही, हे तिने वेळीच हेरले. तिच्यात ती दूरदृष्टी होती. पोर्तुगीज धोकादायक आहेत, हा इतिहास तिला माहित होता.

झामोरिनसारखा बलिष्ठ नायर शासक केवढ्या अडचणीत आलेला आहे याचीही तिला कल्पना होती. पण लक्ष्मप्पाला वारंवार समजाऊन सांगूनही तो काही एक ऐकण्याच्या स्थितीत नव्हता. याची परिणती म्हणून दोघांमधील दुरावा पराकोटीचा वाढला. अब्बक्का स्वतंत्र बाण्याची स्त्री असल्याने मातृसत्ताक पद्धतीच्या नियमाने तिने लक्ष्मप्पाला एक तर पोर्तुगीजांशी संबंध तोड अथवा मला घटस्फोट दे, असा निर्वाणीचा इशारा दिला. पोर्तुगीजांच्या भेटवस्तू, त्यांनी दिलेले व्यापारी भागीदारीचे आमिष यांमुळे

अंध झालेल्या लक्ष्मप्पाने आता ही ब्याद नको म्हणून अब्बक्काच्या घटस्फोटाच्या मागणीला मान्यता दिली.

रीतसर घटस्फोट देताच अब्बक्काने तिला वधूमूल्य म्हणून मिळालेले सारे जड-जवाहीर परत केले. ती परत आपल्या घरी उल्लाळला जायला तयार झाली. नेत्रावती नदी मंगलोरमधून वाहत जाते आणि उल्लाळ येथे समुद्राला मिळते. मंगलोर आणि उल्लाळ हे अंतर फार कमी म्हणजे १३-१४ किलोमीटर आहे. तसे म्हटले तर ही जुळी राज्ये. मातृसत्ताक पद्धतीमुळे हे झालेले तात्पुरते विभाजन. नेत्रावती नदी हे त्या काळातील महत्वाचे प्रवासाचे माध्यम होते. बंट समाजाच्या प्रदेशातून वाहत असल्याने या नदीला बंटवाल नदी असेही म्हणत. अब्बक्का नेत्रावती नदीमधून उल्लाळला जाण्यासाठी प्रवास करत असतानाच पोर्तुगिजांच्या चिथावणीमुळे लक्ष्मप्पाने तातडीने आपल्या लष्करी नौका पाठवल्या, त्या तिला कैद करून आणण्यासाठी. घरी जाणे एवढाच हेतू असलेल्या अब्बक्काची प्रतिकाराची कसलीही तयारी नव्हती. लक्ष्मप्पा आपल्याला कैद करण्याचा विचार करेल, याची तिने कसलीही कल्पना केलेली नव्हती. जेव्हा तिला सैनिकी नावांनी घेरले, तेव्हा लक्ष्मप्पाचे कपट तिच्या लक्षात आले.

यामागील खरे सूत्रधार कोण, हेही ओळखायला तिला वेळ लागला नाही. कसलाही प्रतिकाराचा प्रयत्न न करता ती लक्ष्मप्पाच्या सैनिकांच्या हाती स्वाधीन झाली. त्यांचा परतीचा प्रवास सुरू झाला, पण ते परत जाईपर्यंत पोर्तुगीज आणि लक्ष्मप्पामध्ये एका नव्या वादाची ठिणगी पेटलेली होती. पोर्तुगीजांनी मंगलोर येथे आपली वखार स्थापन करण्याची अनुमती मागितली होती आणि याला मात्र लक्ष्मप्पा राजी नव्हता. व्यापारातील भागीदारी ठीक होती पण आपल्या महत्वाच्या बंदराच्या ठिकाणी परकीयांची वखार ही कल्पना त्याला सहन होत नव्हती. कैद केलेल्या अब्बक्काला त्याच्यासमोर आणले गेले तेव्हा तो अपराधभावनेने ग्रस्त झाला होता. पोर्तुगीजांविरुद्ध जिने आपल्याला नेहमीच सावध केले तिला आपण घटस्फोट दिला, एवढेच नव्हे तर तिला कैदही केले आणि तिचा स्वाभिमानही दुखावला या जाणीवेने तो अस्वस्थ झाला. स्वत:लाच दोष देऊ लागला.

अब्बक्काने त्याला सांगितले, हे लोक परके. दूर देशातून आलेले. त्यांची संस्कृती वेगळी. आचार-विचार वेगळे. व्यापार करावा हे ठीक, पण स्थानिक सत्तांच्या

कारभारात लुडबुड करावी हे मात्र अक्षम्य. या लोकांनी आपली सत्ता पसरवली आहे. उद्या ते आपली राज्येही गिळंकृत करतील. आपल्याला हर क्षणी सावध राहवे लागेल. स्वत:ला युद्धसज्ज ठेवावे लागेल. लक्ष्मप्पाला हे त्या वेळेस तरी पटले. त्याने अब्बक्काशी पुन्हा आपले संबंध पूर्ववत करण्याची इच्छा प्रकट केली. पण आता अब्बक्का घटस्फोटानंतर पुन्हा त्याच्याशी नव्याने संसार थाटू इच्छित नव्हती.

तिने आता त्याच्या प्रस्तावाला नकार दिला. मग लक्ष्मप्पाने तिच्या आपल्या कब्जात घेतलेल्या खाजगी जमिनी तिला परत केल्या व पोर्तुगीजांशी संघर्ष करण्यात मैत्रीचे वचन मागितले. चंचल मनाचा लक्ष्मप्पा वचन निभावणार नाही हे तिला माहीत असले, तरी ती काही बोलली नाही. ती त्याला निरोप देऊन आपल्या राज्यात परत जायला निघाली आणि तिच्या अपेक्षेप्रमाणेच ती जोवर उल्लाळला पोहोचत नाही तोवर चंचल मनाचा लक्ष्मप्पा पुन्हा पोर्तुगिजांच्या दबावाखाली आला.

मंगलोर महत्त्वाचे व्यापारी शहर असल्याने तेथे आपले ठाण मांडणे पोर्तुगीजांच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. त्यासाठी ते कोणत्याही मार्गाचा वापर करायला तयारच होते. पोर्तुगीजांना अब्बक्का आणि लक्ष्मप्पाच्या पुनर्भेटीची माहिती मिळताच त्यांनी त्याला घेरले.

अब्बक्का आपल्या मार्गातील काटा आहे, हेही त्यांनी जोखले. ते तेवढे धूर्त होतेच. त्यांनी आपली चाल रचली. त्यांनी लक्ष्मप्पाशी नव्याने तह केला. त्याच्यावर आपल्यातर्फे सवलतींचा आणि भेटवस्तूंचा वर्षाव करत आपल्याला एक साधी वखार बांधू द्यायची आणि बंदरातून येणाऱ्या-जाणाऱ्या कोणत्याही देशांच्या जहाजांवर कर आकारू देण्याची मागणी मान्य करून या मागण्या पूर्ण केल्या नाहीत, तर मंगलोर बंदर उद्ध्वस्त करून टाकण्याचीही धमकी दिली. आपल्या माजी पत्नीशीही कसलेही राजकीय संबंध ठेवायचे नाहीत असेही सुनावले.

लक्ष्मप्पा या मागणीमुळे हादरून गेला; पण मंगलोर बंदराभोवती पोर्तुगीजांची लढाऊ जहाजे उभी आहेत, याची कल्पना येताच तो कोंडीत सापडला.

पोर्तुगीजांशी लढायचे त्याच्यात साहस नव्हते. तेवढी तयारीही नव्हती. त्याची पुरती कोंडी झालेली होती. त्याने मान खाली घालून नाइलाजाने पोर्तुगीजांच्या प्रस्तावाला मान्यता दिली आणि तहावर सही केली. ही बातमी मिळाली, तेव्हा

अब्बक्का आपल्या राज्यात परत आली होती. तेव्हा तिची थोरली बहीण राणीपदावर होती आणि तिचे काका तिरूमलराया राज्याचे मुख्य प्रधान म्हणून काम पाहत होते. बंगा आणि पोर्तुगीज यांच्यात झालेल्या अपमानास्पद मैत्री-कराराची तिला माहिती मिळाल्यानंतर ती संतप्त होणे स्वाभाविक होते. आपला माजी नवरा विश्वासघातकी आणि अवसानघातकी निघाल्याचा संताप तिला असह्य होत होता.

आता काहीही करून मंगलोर राज्यात घुसून बसणाऱ्या पोर्तुगीजांना आणि खुद्द लक्ष्मप्पाला धडा शिकवणे गरजेचे होते; पण तिच्या अखत्यारीत सेना नव्हती. राणी असलेली तिची बहीण आजारी होती. उल्लाळची सेना तिच्या अनुमतीखेरीज अब्बक्काला मिळणे शक्य नव्हते आणि सेनेशिवाय लढता येणे कसे शक्य होते? पण एका परीने देशद्रोह करणाऱ्या आपल्याच पतीशी ती युद्ध करणारी जगातील एक अद्वितीय तेजाची महिला बनणार होती. आपल्याकडे सैन्यशक्ती नाही हे जाणून तिने दूरदृष्टीने शेजारच्याच बिदनूरच्या नायक राजाशी संधान बांधले. आपल्या मालकीच्या काही सुपीक जमिनी देण्याच्या मोबदल्यात तिने त्याचे लष्करी साहाय्य मागितले. ते बिदनूरच्या राजाने मान्य केले. त्याने आपली सेना तिच्या नेतृत्वाखाली लढण्यासाठी पाठवली. अब्बक्का आता आपल्या माजी पती लक्ष्मप्पा आणि पोर्तुगीजांविरुद्ध लढण्यास सज्ज झाली.

१५४२-४३ च्या दरम्यान लक्ष्मप्पा आणि अब्बक्का या दोघात बांगेर राजधानीजवळ भीषण युद्ध झाले. पोर्तुगीजांनी लक्ष्मप्पाच्या मदतीसाठी आपली कवायती सैन्य युद्धात उतरवले; पण गनिमी कावा करून अब्बक्काने लक्ष्मप्पा आणि पोर्तुगीजांच्या संयुक्त सेनेचा दारुण पराभव केला.

ती स्वत: उत्तम घोडेस्वार तर होतीच पण तेवढीच निष्णात तिरंदाज आणि तलवारबाजही होती. या युद्धात बंगा किल्ल्यालाही मोठी क्षती पोचवली गेली. अब्बक्काने पार मंगलोर बंदरापर्यंत धडक मारली आणि पोर्तुगीजांची बांधकाम सुरू झालेली वखार उखडून टाकली. पोर्तुगीजांची बंदरात नांगरून पडलेली अनेक जहाजे बुडवून टाकली.

पोर्तुगीजांची एवढी दुर्दशा आजवर एकाही देशी सत्तेने केलेली नव्हती. ही बातमी गोवा येथील पोर्तुगीज मुख्यालयाला कळाली, तेव्हा तेथील लोकही सुन्न झाले. असा

आपल्याला कोणी हादरा देईल, याची त्यांनी स्वप्नातही कल्पना केली नव्हती. अब्बक्काने त्याचे राज्य आपल्या ताब्यात घेतले नसले, तरी माजी पत्नीच्या हातून झालेला लक्ष्मप्पा या पराजयाने खचून गेला. त्याचा अहंकार दुखावला गेला. पण जे झाले त्यापासून धडा घेण्याऐवजी तो आता आपली हयात अब्बक्काच्या विनाशासाठी घालवणार होता. शत्रूला सर्वतोपरी सहकार्य करणार होता. भारताचा आणि जगाचाही इतिहास हा अशाच अप्पलपोट्ट्या आणि व्यक्तिगत अंध महत्त्वाकांक्षी लोकांनी विद्रूप करून ठेवलेला आहे, आणि यानंतर काही काळातच उल्लाळमध्ये अजून एक घटना घडून आली. सत्तेवर असलेली अब्बक्काची थोरली बहीण १५४४ च्या दरम्यान दिवंगत झाली. राणीपद रिक्त झाले. काका तिरूमलरायाने अब्बक्का आता राणी असेल, असे घोषित केले. मातृसत्ताक पद्धतीच्या रचनेप्रमाणे हे होणार, हेही पक्केच होते. आता अब्बक्का राणी बनणार, हे निश्चित झाले.

सन १५४४ मध्ये अब्बक्का चौटा राज्याची प्रमुख बनली. एक नवे पर्व सुरू झाले, जे इतिहासात सुवर्णाक्षराने लिहिले जाणार होते. पोर्तुगीज या घडामोडीवर लक्ष ठेवून होते. अब्बक्का भविष्यात आपल्याला डोकेदुखी बनणार हे त्यांनी हेरले. त्यासाठी सावध हालचालीही सुरू केल्या; पण अब्बक्का हे सारे ओळखून होती. तिने सत्तेवर येताच सर्वप्रथम आपल्या नागरिकांच्या हिताची कामे करायला प्राधान्य दिले. प्रजेचा विश्वास उरला नाही, तर जगातली कोणतीही सत्ता टिकत नाही, हे तिला माहित होते. त्यामुळे ती सुरुवातीला प्रजाहिताच्या कामातच व्यग्र होऊन गेली.

***

४. पोर्तुगीजांना दुसरा धडा

अब्बक्का इतिहासातील पहिली राणी होती जिने मध्ययुगीन भारताच्या इतिहासामध्ये आपल्या राज्याच्या आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी परकीय आक्रमकांविरुद्ध लढा दिला. अनेकदा ती सैन्याचे व नौदलाचे नेतृत्व करत प्रत्यक्ष रणांगणावर उतरली. इतिहासातील ज्ञात असलेल्या सर्व स्त्री-योद्ध्यांमध्ये, जैन राणी अब्बक्का ही एक अत्यंत कर्तृत्ववान आणि महान विभूती होती.

ती अत्यंत शूर आणि निर्भीड होती. युरोपियन लोकांमध्ये तिची मोठी ख्याती होती आणि ते तिला वचकून असत. मध्यपूर्वेत तर ती लोकप्रियतेच्या शिखरावर होती. दुर्दैवाने, भारतात राहूनच इतिहासाचा अभ्यास करणाऱ्या अनेक भारतीयांनी तिच्याबद्दल कधीच फारसे ऐकलेले नाही. हे आपल्या शिक्षणतज्ज्ञांच्या चुकीचे एक ठळक उदाहरण आहे. जेव्हा एखादा परकीय आक्रमक आपल्या मातृभूमीवर हल्ला करतो, तेव्हा त्या मातृभूमीचे रक्षण कसे करावे, हे तुम्ही तुमच्या तरुण पिढीला शिकवणार तरी कसे?

जैन राणी अब्बक्का हिने बलाढ्य पोर्तुगीज सैन्य आणि नौदलाचा वारंवार पराभव केला. तिला आपल्या हयातीतच तिच्या निर्भयपणामुळे अभया राणी (Fearless Queen) ही पदवी लोकांनीच बहाल केली होती. राणी अब्बक्का आणि पोर्तुगीजांविरुद्ध तिने दिलेल्या लढ्याविषयीची आपली बहुतेक माहिती प्रामुख्याने अरबी आणि पोर्तुगीज स्रोतांवर आधारित आहे.

सतराव्या शतकात भारताचा दौरा करणाऱ्या इटालियन प्रवासी पिएत्रो डेला व्हॅले याने या शूर राणीविषयी खुद्द पर्शियन सम्राट शाह अब्बास यांच्याकडून ऐकले होते. सम्राट अब्बासने उल्लाळ बंदर काबीज करण्याचा पोर्तुगीजांचा प्रयत्न हाणून पाडण्यात राणीने दाखवलेल्या धैर्याची मुक्तकंठाने प्रशंसा केली होती. म्हणजेच, अब्बक्काची कीर्ती तिच्याच हयातीत सर्वदूर पसरली होती.

भारतात आता पोर्तुगीजांच्या मागोमाग इंग्रज, फ्रेंच आणि डच व्यापारीही येऊ लागले होते. त्यांनीही पोर्तुगीज व्यापाऱ्यांचा आदर्श ठेवून भारतात वसाहती स्थापन

करण्याचा चंग बांधला होता. स्थानिक सत्ताधारी विरोध करत असल्याने त्यांना हवे तेवढे यश मिळत नसले, तरी आधुनिक शास्त्रास्त्रांचा वापर करून ते आपले घोडे पुढे दामटत चाललेले होते.

पोर्तुगीजांनी अर्थात सुरुवातीला आघाडी घेतली. कालिकत, गोवा आणि दीव-दमन भाग आता त्यांच्या अखत्यारीत गेल्यात जमा होते. आपली सत्ता स्थापन होताच धर्मांतराचेही उद्योग वाढीला लागले होते. स्थानिक सत्ताधारी नावाला उरलेले होते. मंगलोरला आपली हार झाली आणि तेथे वसाहत करण्याचा प्रयत्न अब्बक्कामुळे अयशस्वी ठरला, ही बाब पोर्तुगीज विसरू शकत नव्हते. त्यामुळे हिला आधी धडा शिकवायला हवा, याची तयारी त्यांनी सुरू केलेली होती.

पण पोर्तुगीज धूर्त होते. अब्बक्काच्या पराक्रमाची चुणूक त्यांनी पाहिलेली होती. त्यामुळे अब्बक्का राणीपदावर आसनस्थ होताच त्यांनी तिच्याकडे आपले शिष्टमंडळ पाठवले आणि उल्लाळ बंदरातून व्यापार करण्याची परवानगी मागितली. तिच्यासमोर बहुमोल नजराणेही ठेवले; पण अब्बक्काने त्यांना साफ धुडकावून लावले व नजराण्यांचाही अव्हेर केला. आमच्या बंदरातून आमचेच व्यापारी व्यापार करतील, कोणाही परकीय लोकांना तो अधिकार नाही, असे तिने निक्षून सांगितले. असा स्पष्ट नकार मिळाल्यामुळे पोर्तुगीज वकिलांना रिकाम्या होती परत फिरावे लागले.

अब्बक्काने भविष्यात पोर्तुगीज काय करू शकतील, याचा अंदाज बांधून आपले प्रशासन व लष्करी व्यवस्था मजबूत करायला सुरुवात केली. अब्बक्का धर्माने जैन असूनही कोणताही समाजघटक असंतुष्ट राहून शत्रूला सामील होऊ नये, म्हणून प्रशासकीय व लष्करी व्यवस्थेत सर्व समाजघटकाना योग्य प्रतिनिधित्व दिले. तिच्या नौदलातही सर्व पंथ आणि जातींच्या लोकांचा समावेश होता.

शेजारच्या राजवटीशीही तिने राजकीय संबंध प्रस्थापित करायला सुरुवात केली. कालिकतचा झामोरिन त्यात प्रमुख होता. त्यानेही अब्बक्काला योग्य प्रतिसाद दिला. व्यापारास अनुमती दिली नाही म्हणून चिडलेल्या पोर्तुगीजांनी राणी अब्बक्काकडे चक्क वार्षिक खंडणीची मागणी केली; पण अब्बक्काने तीही साफ धुडकावून लावली. ही पोर्तुगीजांना दिली गेलेली दुसरी चपराक होती.

अब्बक्काने उल्लाळ या राजधानीच्या शहरातील किल्ला अजून मजबूत करायला सुरुवात केली. आपल्या लढाऊ जहाजांची संख्या वाढवण्यासाठीही मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरू केले. अरबी समुद्रावर लक्ष ठेवण्यासाठी आणि आपल्या बंदरातून जाणाऱ्या माल भरलेल्या जहाजांच्या रक्षणासाठी गस्ती नौकांचीही व्यवस्था केली.

त्यामुळे किनारपट्टीवरील अन्य बंदरांपेक्षा उल्लाळ बंदराला देशी-विदेशी व्यापारी जास्त प्राधान्य देऊ लागले. तिची कररचना सौम्य असल्याचाही व्यापारी फायदा घेत. त्यामुळे उल्लाळच्या खजिन्यात दिवसेंदिवस भर पडू लागली. उल्लाळ बंदर भरभराटीला येत आहे, हे पाहणे पोर्तुगीजांना कसे शक्य होते? मग त्यांनी खोल समुद्रात गेलेल्या उल्लाळहून निघालेल्या जहाजांना वाटेतच अडवून लुटायला सुरुवात केली. यामुळे व्यापारी हवालदिल झाले. त्यांनी पोर्तुगीजांकडे अशी लूटमार करू नका म्हणून विनवण्या करायला सुरुवात केली.

पोर्तुगीजांनी त्यांना फर्मान काढले की, आता भारतीय वा अन्य व्यापारी आपला माल पोर्तुगीजांनाच आणि तोही ते म्हणतील त्याच भावात विकतील. त्यांना कोणाशीही थेट व्यापार करता येणार नाही. कोणत्याही व्यापाऱ्याला अशी दडपणूक करणारी मक्तेदारी सहन होणे शक्य नव्हते; पण अरबी समुद्र आता पोर्तुगीजांच्या जहाजांनी व्यापला जाऊ लागला होता. पोर्तुगीजांना टाळून व्यापार करता येणेही शक्य नव्हते.

या लोकांना देशातील सारा व्यापारच आपल्या ताब्यात घ्यायचा आहे, हे लोकांना समजत होते; पण पोर्तुगीजांची लष्करी शक्तीही अचाट होती. त्यांना तोंड देता येणे व्यापाऱ्यांना शक्य दिसत नव्हते. ते हवालदिल झाले. व्यापार अस्ताव्यस्त झाला आणि त्याचा फायदा घ्यायला पोर्तुगीज अर्थातच पुढे सरसावले. त्यांना जे हवे होते ते घडू लागले होते. अब्बक्कापर्यंत व्यापारी तक्रार घेऊन आले. न्यायपूर्ण कारभारासाठी प्रसिद्ध असलेल्या अब्बक्काला हे प्रकार माहीत पडले होते. पोर्तुगीजांच्या भक्षक प्रवृत्तीचा संताप येत होता. त्यांना काही धडा शिकवणे आवश्यक होते. तिने व्यापाऱ्यांना आश्वस्त केले. जहाजांमध्ये आपापला माल भरून सज्ज राहाण्याची सूचना केली. आपले लढाऊ नौका दलही सुसज्ज केले. कालिकतच्या झामोरिनला पत्र पाठवून त्यालाही आपली लढाऊ जहाजे मदतीस पाठवण्याचे आवाहन केले.

झामोरिनला तिची कल्पना आवडली. प्राप्त स्थितीत पोर्तुगीजांच्या नाकावर टिच्चून व्यापार करण्याची ही महत्वाची संधी आहे हे त्याच्या लक्षात आले. त्यानेही आपल्या लढाऊ नौका उल्लाळ बंदराच्या दिशेने पाठवून दिल्या. पोर्तुगीज या हालचालींवर लक्ष ठेवून होते. अब्बक्का राणी आणि झामोरिन एकत्र येऊन आपल्याशी युद्धाची तयारी तर करत नाही आहेत ना, अशी त्यांना आधी शंका आली. त्यांनीही आपल्या रक्षणाची जय्यत तयारी सुरू केली. तोवर उल्लाळ बंदरात साठ जहाजे विविध प्रकारचा माल भरून जय्यत तयार होती. त्यांना अब्बक्का आणि झामोरिनच्या युद्धसज्ज नौका व्यापारी जहाजांना घेरून उभ्या होत्या.

पहाटेची वेळ होती. अब्बक्का स्वत: बंदरावर आलेली होती. तिने सर्व व्यापाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. जहाजे हाकारायला तयार होती. उल्लाळमधील सोमेश्वर मंदिरात अविरत घंटानाद सुरू होता. हवा शांत वाहात होती. भरती सुरू झालेली होती. जहाजे शिडे उभारून पाण्यावर डोलत होती. अब्बक्काने इशारा करताच एकेक जहाज

हाकारले जाऊ लागले. खलाशी आणि व्यापारी जल्लोष करत होते. आखाताच्या दिशेने या व्यापारी जहाजांचा प्रवास सुरु झाला होता. लढाऊ नौका त्यांना संरक्षण द्यायला सज्ज होत्या. आता कोणतेही पोर्तुगीज जहाज त्यांना अडवायचे व लुटायचे धाडस करू शकणार नव्हते आणि एवढ्या सशस्त्र जहाजांच्या रक्षणात एवढा मोठा काफिला जातो आहे, हे कळताच पोर्तुगीजांची पाचावर धारण बसली. अब्बक्का आपल्याला असा शह देईल याची त्यांनी स्वप्नातही कल्पना केलेली नव्हती.

हे आपल्या मक्तेदारीला पडलेले सर्वांत मोठे खिंडार आहे, हे त्यांच्या लक्षात आले; पण त्या क्षणी तरी ते काहीही करू शकत नव्हते. हात चोळत बसणाऱ्यांपैकीही ते नव्हते. पण हीच आता भारतीय व्यापाराची पद्धत बनली, तर मात्र आपल्याला व्यापार करणे कठीण जाईल, हेही त्यांच्या लक्षात आले. व्यापाऱ्यांचा पहिला काफिला आखातात अगदी सुरक्षित पोहोचला. तेथून विविध प्रकारचा माल घेऊन भारताच्या किनाऱ्यालाही लागला.

आता भारतीय आणि चिनी-अरबी व्यापाऱ्यांना हायसे वाटू लागले. पोर्तुगिजांच्या आसुरी आकांक्षेला सडेतोड उत्तर देणारे कोणीतरी आहे, ही बाब त्यांना दिलासा देणारी वाटली असल्यास नवल नाही.

व्यापाऱ्यांचा उत्साह वाढला. राणीच्या रक्षणाखाली आपण पूर्ववत व्यापार करू शकतो, हा आत्मविश्वास वाढला. रक्षणासाठी थोडा अधिक कर भरणे त्यांना सोयीचे होते. अब्बक्का आणि झामोरिनला व्यापार वाढवायची संधी मिळत होती. किनारपट्टीवरील इतरही राजे आता अब्बक्काचे अनुकरण करणार होते.

खरे तर यामुळे पोर्तुगीजांच्या व्यापाराला आणि वसाहतवादी भूमिकेला जबरी हादरा बसणार होता. पण...भारतीय इतिहासाला या 'पण' आणि 'परंतु'ने भेडसावून सोडलेले आहे. पोर्तुगीज पुढे काय चाल खेळतील याची अब्बक्काला कल्पना आली असली, तरी इतर शासक मात्र आपापल्या सत्तेच्या नशेत चूर होते. प्रत्येक सत्तेचे स्वत:चे अहंकार होते, मद-मत्सर होते. खुद्द अब्बक्काचा माजी पती या जगावेगळ्या साहसी राणीच्या विरोधात होता. राणीने रचलेला व्यूह मजबूत होता; पण तो उद्ध्वस्त करायला एतद्देशीय नको त्या उत्साहाने पुढे येणार होते. राणीला एकटे पाडण्यासाठी पोर्तुगीज सर्व

शक्तीनिशी तिच्यावर तुटून पडणार, हे अन्य कोणाला समजले नसले तरी खुद्द अब्बक्का ही शक्यता नजरेसमोर ठेवून आपल्या बंदोबस्तात वाढ करत चालली होती.

अद्याप तरी बंदरातून जहाजे रवाना होत होती, ती तिच्या रक्षणात; पण पोर्तुगीज त्यातही काही अडसर उभा करतील, याचीही तिला कल्पना होती. त्यासाठी ती आपल्या लढाऊ नौकांना आधुनिक शस्त्रांनी सज्ज करण्याच्या प्रयत्नात होती. पोर्तुगीज तिच्या सर्व हालचालींवर लक्ष ठेऊन होते. अब्बक्कानेही आपले हेर पोर्तुगीजांच्या गोटात नेमायला सुरुवात केली. खवळलेले पोर्तुगीज आता आपल्याविरुद्ध काय कारवाई करतात, याचीच तिला उत्सुकता होती आणि सर्वांत मोठी शक्यता होती ती युद्धाची...

आणि ती गृहीत धरूनच अब्बक्का आपली संरक्षण आणि आक्रमण योजना कटाक्षाने धीराने आणि धैर्याने पुढे नेत होती.

***

५. पोर्तुगीजांचा उल्लाळवर हल्ला

राणी अब्बक्काने घेतलेले व्यापारी धोरण पोर्तुगीजांना अडचणीत आणू लागले. भारताच्या किनारपट्टीवरील अनेक राजे व सामंतही त्याच धोरणाची कास धरतील की काय ही भीती पोर्तुगिजांना वाटू लागली. खरे तर पोर्तुगाल हे त्या काळात फार मोठी सागरी शक्ती म्हणून उदयाला आले होते. त्या बळावर जगभर आपली सत्ता पसरवण्याची महत्त्वाकांक्षा पोर्तुगालच्या राजात निर्माण झालेली होती. अशात कोणी एक अब्बक्का नावाची छोट्या राज्याची राणी आपल्या महत्त्वकांक्षेला लगाम घालते आहे, हे त्यांना सहन होण्यासारखे नव्हतेच. त्यामुळे काहीही करून अब्बक्का राणीला नेस्तनाबूत केले पाहिजे, असे संदेश थेट पोर्तुगालहून येथील व्हाईसरॉयला येऊ लागले. त्यामुळे पोर्तुगिजांनी अब्बक्काच्या उल्लाळ बंदरावरच थेट स्वारी करून तिचा पराभव करण्याचा निर्णय घेतला. त्याखेरीज इतर भारतीय सत्ता व व्यापारी वठणीवर येणार नाहीत याची

खूणगाठ त्यांनी बांधली.

अब्बक्काचे बळ मात्र त्यांनी फारच कमी लेखले. देशी नौकादल आपल्या बलाढ्य नाविक दलाला तोंड देऊ शकणार नाहीत, असे त्यांना वाटले. त्यांनी सुरुवातीला तिला एक प्रकारे हलक्यात घेतले आणि तिला पकडून गोव्याला आणण्यासाठी चार बोटी व पाचशे सैनिक पाठवले. या बळावर आपण अब्बक्काला गुडघे टेकायला भाग पाडू, असा विश्वास त्यांना होता. पण या नौका जशा उल्लाळ बंदराजवळ येऊ लागल्या, तशा सावध अब्बक्काच्या नौदलाने त्यांना आडकाठी केली आणि असा काही भीषण हल्ला चढवला की, त्यांच्या तीन बोटीना आग लागली आणि एक बोट बुडाली. त्यावरचे सारे सैनिक आणि खलाशी एक तर मारले गेले किंवा त्यांना जलसमाधी घ्यावी लागली. त्या बोटी पुन्हा कधीच गोव्याला पोहोचू शकल्या नाहीत. अब्बक्काच्या नौदलाने विकसित केलेले अग्निबाणांचे तंत्र या युद्धात यशस्वीरीत्या वापरले.

यामुळे पोर्तुगीजांना फार मोठा धक्का पोहोचला. त्यांनी अशा पराभवाची कधी कल्पनाही केली नव्हती. ते धास्तावून गेले. पण यातून धडा घेण्याचाही प्रश्न नव्हता, ते एवढे पोर्तुगीज मस्तवाल झालेले होते. आता पोर्तुगिजांना कडक धोरण आखणे क्रमप्राप्त झाले. त्यांनी नवीन योजना आखायला सुरुवात केली. या योजनेनुसार त्याची लढाऊ जहाजे उल्लाळ बंदराला घेरणार होती. त्यांना बाहेरून मदत येऊ नये यासाठीही पुरेसा बंदोबस्त ठेवला जाणार होता. उल्लाळची नाकेबंदी करून शहरात घुसायचे. राणीशी युद्ध करून तिला हरवायचे आणि आपले मांडलिक बनवायचे धोरण त्यांनी आखले. त्यासाठी कोची, कालिकत आणि गोव्यावरून सैनिकी आणि आरमाराची रसद पुरवायचेही ठरले.

आता एवढी तयारी केल्यानंतर राणी अब्बक्काला शरण येण्याशिवाय कोणताही पर्याय उरणार नाही, याची खात्री पोर्तुगिजांनी करून घेतली. जे अब्बक्काला साथ देऊ शकतील अशा राजांना लाच देण्यासही त्यांनी कमी केले नाही.

आता गरज होती ती अब्बक्काशी काही कारण काढून कुरापत करण्याची. त्याशिवाय तिच्याविरुद्ध युद्ध घोषित करता येणे कसे शक्य होते?

एव्हाना लक्ष्मप्पा आरासाशी कधी मैत्री, तर कधी शत्रुत्वाचे नाते ठेवत मंगलोर

बंदरावर त्यांनी आपले वर्चस्व स्थापन केलेले होते. हे बंदर उल्लाळ बंदरापासून अवघ्या काही किलोमीटर लांब होते. पोर्तुगिजांचे आरमार मंगलोर आणि आसपासच्या बंदरांजवळ जमा होऊ लागले.

ॲडमिरल डोम अल्वारो दा सिल्वेरा हा अनुभवी दर्यावर्दी या मोहिमेचे नेतृत्व करणार होता. त्याच्या नेतृत्वात पोर्तुगीजांनी अनेक सागरी युद्धांत विजय मिळवलेला होता. त्यामुळे आपण या लष्करी कारवाईत यशस्वी होऊ. हा आत्मविश्वास त्यांच्यात होता. आक्रमणाची अशी जय्यत तयारी करूनच मग त्यांच्या वकिलांनी राणीच्या दरबाराला भेट दिली आणि आपल्या जुन्याच मागण्या समोर ठेवल्या.

राणीने दरवर्षी खंडणी द्यावी, मसाले व इतर सर्व वस्तू थेट निर्यात न करता फक्त पोर्तुगीजांनाच विकाव्यात आणि ते देतील तेवढाच कर मान्य करावा, या अटी राणी अब्बक्का कधीच मान्य करणार नाही हे त्यांना चांगलेच माहित होते. पण शेवटी त्यांना युद्धासाठी बहाणा पाहिजे होता आणि अपेक्षेप्रमाणेच अब्बक्काने त्यांच्या मागण्या साफ धुडकावून लावल्या. तिने पोर्तुगीज वकिलांना खाली हातांनी परत पाठवले.

१६२३ मध्ये एक प्रसिद्ध प्रवासी आणि इतिहासकार पिएट्रो डेला व्हॅले भारतात आला होता. त्याने अरबस्तानात असतानाच अब्बक्काच्या कथा ऐकल्या होत्या आणि तो खूप प्रभावित झाला होता. तो भारतात आला, तेव्हा राणी अब्बक्का हयात नव्हती. तिची कन्या किरिया अब्बक्का सत्तेवर होती. त्याने अब्बक्काच्या कन्येची भेट घेतली. सुरत आणि गोवा येथे त्याचे जास्त वास्तव्य असले, तरी अब्बक्का राणीबद्दल ऐकून असल्याने त्याने तिच्या मुलीची भेट घेण्याचा प्रयत्न सुरू केला. भारतात असताना गोवा प्रदेशाचा मुख्य प्रशासक असलेल्या विठ्ठल शेणॉय याच्यामार्फत पिएट्रो डेला व्हॅले याची दक्षिण भारतातील केलाडीच्या नायक राजाशी ओळख झाली.

त्याच्या प्रवासाचे वृत्तांत हे त्या प्रदेशाच्या इतिहासाचे एक अत्यंत महत्त्वाचे साधन आहेत. त्याच्या लेखनातून तो तिच्या झुंजार व्यक्तिमत्त्वाने मोहित झाल्याचे दिसून येते. तिच्याबद्दल ऐकून तिच्या लढाऊ स्वभावामुळे त्याला तिच्याबद्दल आकर्षण निर्माण झाले आणि त्याने तिच्या मुलीला, म्हणजे किरिया अब्बक्काला भेटण्यासाठी आधी अनेक प्रयत्न केले; पण शेवटी त्यांची पहिली भेट झाली ती उल्लाळच्या बाजारपेठेत. त्याच्या प्रवासीपणातून आलेल्या अनुभवांमुळे किरिया अब्बक्काला त्याच्याबद्दल

कुतूहल वाटले. एका दुभाष्याच्या मदतीने त्यांच्यात संवाद झाला आणि त्या प्रवाशाचे

(पिएट्रो डेला व्हॅले व किरिया अब्बक्काची भेट)

चौफेर ज्ञान पाहून त्याला राजवाड्याला भेटण्याचे आमंत्रण देण्यात आले.

आपल्या लेखनात पिएट्रो डेला व्हॅले तिच्या परिपूर्ण सामर्थ्याची, सावळ्या पण देखण्या व्यक्तिरेखेची आणि तिच्या अनुकरणीय चिकाटीची मनसोक्त तारीफ करतो. त्याच्या मते तिची माता अब्बक्का राणी युद्धाच्या कृतींमध्ये आणि महत्त्वाच्या राजकीय आणि लोकहिताच्या बाबींमध्ये सक्रिय आणि जोशिली होती. रात्रीच्या वेळीही ती विश्रांती घेण्याचे टाळून ती तिच्या प्रजेला न्याय देण्यासाठी नेहमी तत्पर राहत असे. तिच्या लोकप्रिय कथांनी तो जास्तच प्रभावित झाला. त्याने ऐकून केलेले तिचे वर्णन एकाच वेळी भावपूर्ण आणि वास्तववादी आहे. जग फिरलेल्या परकीय प्रवाशालाही

प्रभावित करणारी ही पराक्रमी राणी होती.

किरिया अब्बक्काही मातेप्रमाणेच प्रजावत्सल राणी होती. पिएट्रो डेला व्हॅले तिला भेटला, तेव्हा ती सिंचनासाठी कालवे बनवण्याच्या कार्यात मग्न होती. मातेप्रमाणेच तीही अत्यंत साधेपणाने रहायची.

थोडक्यात, तिनेही मातेचा वारसा जपला होता. किरियानेही १६१८ मध्ये साली पोर्तुगिजांशी एक मोठे युद्ध करून विजय मिळवला होता. त्यामुळे तिचीही कीर्ती अक्षय्य अशीच होणे स्वाभाविक होते. हा परदेशी प्रवासी तिच्याही व्यक्तिमत्त्वाने आणि साधेपणामुळे प्रभावित झाला होता, हे त्याच्या आत्मवृत्तावरून दिसून येते. असो. आपण १५५६ सालाकडे परत येऊ.

अब्बक्काने पोर्तुगिजांच्या सर्व मागण्या धुडकावून लावल्यामुळे पोर्तुगिजांनी आधीच ठरवल्याप्रमाणे युद्धाची घोषणा न करताच उल्लाळ बंदराच्या दिशेने लढाऊ जहाजे पाठवून अचानक आक्रमण करण्याचा निर्णय घेतला.

इकडे राणीने त्यांच्या नाकावर टिच्चून मसाल्यांनी भरलेली चार जहाजे संरक्षणात मध्य पूर्वेला पाठवली. त्यामुळे तर पोर्तुगीज आणखीच अस्वस्थ झाले; पण अब्बक्का सावध होती. तिचे हेर आपली कामगिरी चोख बजावत होते. यांना अचानक हल्ला करायचा आहे तर आपणही त्यांना अचानक धक्का देऊ, असा अब्बक्काने विचार केला आणि गुप्तपणे सर्व सावधगिरीने तयारी सुरू ठेवली.

ॲडमिरल डोम अल्वारो दा सिल्वेरा अब्बक्काच्या विरुद्ध तातडीने नाविक कारवाई करायला निघाला. कोठेही प्रतिकार झाला नाही, हे पाहून त्यांचा जीव भांड्यात पडला खरा, पण त्यांनी आपली जहाजे नांगरली आणि नौकांमध्ये बसून पोर्तुगीज सैनिक उल्लाळ किनाऱ्यावर उतरायला निघणार, तेवढ्यात अब्बक्काच्या नाविक दलाने त्या जहाजांना घेरण्यास सुरुवात केली.

बरे घेराही अशा प्रकारचा आणि वेगाने फिरणाऱ्या गस्ती नौकांचा होता की, कोणाला टिपायला जावे, तर तेही शक्य होत नव्हते. तोफांचे नेम चुकत होते. तोफगोळे वाया जात होते. पोर्तुगीज जहाजांच्या जवळ आल्यावर पाहता पाहता अब्बक्काच्या नाविक दलाने अल्वारोच्या जहाजांवर पेटते अग्निबाण सोडायला सुरुवात केली. या

पेटत्या बाणांचा वर्षाव सुरू झाल्यावर पोर्तुगीज जहाजांच्या शिडांना आग लागू लागली. अल्वारो हे युद्धतंत्र पाहून हबकून गेला. तोफांपेक्षा हे वेगळे आणि संपूर्ण देशी तंत्र होते. ते नेमके होते तरी कसे, याची माहिती आपल्याला उपलब्ध साधनांमधून अशी मिळते.

उल्लाळची राणी अब्बक्का चौटा, पोर्तुगीज नौदलाविरुद्ध वापरल्या जाणाऱ्या 'अग्निबाण' या विशेष शस्त्राच्या वापरातील तिच्या प्रवीणतेसाठी लोककथांमध्ये प्रसिद्ध आहे. या तंत्राविषयी आणि त्याच्या वापराविषयी महत्त्वाचे तपशील खालीलप्रमाणे आहेत : तुळूनाडूमध्ये मशाली या कापडाऐवजी नारळाच्या काथ्याचा वापर करून बनवल्या जात असत. या तंत्रातच अब्बक्काने सुधारणा करून अग्णिबाणाची निर्मिती केली. ही तिची अद्भुत कल्पकता होती.

या तंत्रात नारळतेलात भिजवलेल्या नारळाच्याच काथ्याचा वापर केला जात असे. तो मशालीप्रमाणे बाणांच्या टोकांना बांधला जात असे. काथ्या दीर्घ काळ पेटलेला राहू शकत असल्याने आणि त्याची धगही जास्त असल्याने त्याची विध्वंसकता जास्त होती.

हे अग्निबाण तिच्या सैन्याद्वारे, अनेकदा पोर्तुगीज जहाजांच्या शिडांवर किंवा त्यांच्या लाकडी साच्याला आग लावण्यासाठी नेम धरून सोडले जात, ज्यामुळे प्रचंड गोंधळ आणि विध्वंस होत असे. पोर्तुगीज तोफांच्या प्रगत मारक क्षमतेचा सामना करण्यासाठी तिच्या गनिमी काव्यामध्ये अग्निबाण हे एक महत्त्वाचे शस्त्र होते. हे अस्त्र विशेषतः रात्रीच्या हल्ल्यांसाठी प्रभावी होते. त्यामुळे तिच्या सैन्याला जहाजे नष्ट करणे आणि नौदल हल्ले परतवून लावणे शक्य झाले.

पोर्तुगिजांविरुद्धच्या लढाईत या अभिनव अग्निबाणांचा प्रभावीपणे वापर करणारी एकमेव ज्ञात व्यक्ती म्हणून अब्बक्का ओळखली जाते. तिने चार दशकांहून अधिक काळ आपल्या किनारपट्टीवरील राज्याचे रक्षण करण्यासाठी या तंत्रज्ञानाचा उपयोग केला. जरी या तंत्रज्ञानाचे तपशील अनेकदा स्थानिक तुळूनाडूच्या मौखिक इतिहासातून सांगितले जात असले, तरी अग्निबाण हे तिच्या स्वदेशी लष्करी डावपेचांचे आणि परकीय शक्तींविरुद्धच्या प्रतिकाराचे प्रतीक मानले जाते.

पोर्तुगीज जहाजांवर असा अग्निबाणांचा वर्षाव सुरू झाल्यानंतर पोर्तुगीज गोंधळून

गेले. ते आपल्या तोफा कमी पल्ल्याच्या अंतरावर असलेल्या अब्बक्काच्या नौकांवर डागू शकत नव्हते. आता पेटू लागलेली पोर्तुगीज जहाजे अब्बक्काच्या नाविक दलाने चारही बाजूंनी घेरलेली होती.

जहाजांवरील पोर्तुगीज सैनिक पाण्यात उड्या मारून जीव वाचवायचा प्रयत्न करू लागले. एकच हलकल्लोळ उडाला. अल्वारो एवढा अनुभवी योद्धा, पण त्यालाही जहाज सोडावे लागले. ज्या नौका किनाऱ्यावर जाणार होत्या, त्यात बसून त्याला रात्रीच्या अंधारात कसेबसे जीव वाचवून पळून जावे लागले.

पोर्तुगिजांची जहाजे आपसूक अब्बक्काच्या सैनिकांच्या हाती लागली. ती जहाजे आग विझवून सुरक्षित किनाऱ्यावर आणण्यात आली. किनाऱ्यावरीलच आपल्या किल्ल्याच्या तटावरून अब्बक्का हे यश पाहत होती. तिचे मन समाधानाने भरलेले होते. कालिकतचा राजा झामोरिन आणि केलाडीचा राजा वेंकटप्पा नायक यांच्या नौदलांच्या

जहाजांनी या युद्धात अब्बक्काला मदत केली होती, असे अरब वृत्तांत सांगतात. परस्पर सहकार्य हा मैत्रीचा करार अत्यंत दूरदर्शीपणे अब्बक्काने केला होता, त्याचीच ही परिणती होती. बलाढ्य पोर्तुगीज आरमाराला अशा रीतीने शरण आणले, त्यामुळे अब्बक्काची कीर्ती तत्कालीन जगात पसरली. तिच्या धैर्याची आणि साहसाची सर्वत्र वाहवा झाली. हयातीतच अब्बक्का एक दंतकथा बनून गेली तर या दारुण पराभवाने पोर्तुगीज अगदी हबकून गेले. आपली जप्त केलेली जहाजे परत मिळवण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले.

अब्बक्काने त्यांना त्या जहाजांच्या बदल्यात मोठी खंडणी आकारली. पोर्तुगीजांचा नाईलाज होता. त्यांना ती खंडणी निमूटपणे मान्य करावी लागली. राजनैतिक डावपेचातही अब्बक्का वरचढ ठरली. सागरी सत्ता आता देशी आरमाराचीच आणि व्यापाऱ्यांचीच राहील याचा हा सज्जड इशारा होता.

अर्थात, पोर्तुगीज गप्प बसणार नाहीत याचीही जाणीव अब्बक्काला होती. तिने आपल्या राज्यातील सुधारणांचा वेग वाढवला. नवीन नौकांची उभारणी सुरूच ठेवली. उल्लाळ बंदराचाही कायापालट करण्याचे मनावर घेतले आणि तशी तयारी सुरू केली. उल्लाळचा किल्लाही भक्कम करायला सुरुवात केली. आपल्या सैन्यात किनाऱ्यावरील कोळी समाजाची मोठ्या प्रमाणावर भरती सुरू केली. केलाडीचा राजा व्यंकटाप्पा नायक आणि कालीकतचा राजा झामोरीन यांच्याशी आपले राजकीय संबंध कसे दृढ होतील. हेही ती पाहू लागली. कारण हा लढा इतक्यात संपणार नाही याची तिला जाणीव होती.

पोर्तुगीज गप्प बसणार नव्हते. अल्वारोचा झालेला दारुण पराभव त्यांच्या जिव्हारी लागणार होता आणि झालेही तसेच पोर्तुगीजांनी सर्व शक्तीनिशी पुन्हा उल्लाळ बंदरावर हल्ला करण्याचा निर्णय घेतला. अब्बक्का गाफील नव्हती. तिचे हेरखाते समुद्र आणि जमिनीवरही शत्रूची मिळेल ती माहिती दक्षतेने जमा करत होते. उल्लाळ बंदरातून सर्व व्यापार पूर्ववत सुरू झालेला होता. पोर्तुगीज वर्चस्व कमी झाल्याने, दक्षिण किनारपट्टीवरील देशी बंदरांना पुन्हा महत्त्व येऊ लागले होते आणि ते पोर्तुगिजांना सहन होणे शक्य नव्हते! त्यांना काहीही करून राणी अब्बक्काला नष्ट करणे आवश्यक झालेले होते.

***

६. ...पुन्हा हल्ला!

१५५७ साल होते. गेल्या वर्षीच्या युद्धात दारुण पराभव स्वीकारावा लागलेल्या पोर्तुगीजांनी या वेळेस जमिनीवरून आणि समुद्रातून अशी दोन्ही आघाड्यांनी उल्लाळवर हल्ला करण्याची योजना आखली होती. मंगलोर बंदर उल्लाळहून जवळच होते. तेथील पोर्तुगीज किल्ल्यातून पायदळ सैन्य भूमार्गाने आणि किनाऱ्याने नौदल जाईल आणि

एकाच वेळेस शहरावर आतून आणि समुद्रातून बाहेरून हल्ला चढवला जाईल, अशी ती योजना होती.

उल्लाळ बंदर आता चांगलेच भरभराटीला आलेले होते. देश-विदेशाची जहाजे तेथे सुरक्षितपणे येत, नांगरली जात, उल्लाळच्या बाजारपेठेत मोठ-मोठे व्यवहार होत. ठिकठिकाणचे व्यापारीही उल्लाळला येत असल्याने हे शहर चांगलेच गजबजलेले असायचे. अशा शहरावर जमीन आणि समुद्रातून एकाच वेळेस हल्ला झाला तर काय उत्पात माजेल, याची पोर्तुगीजांना चांगलीच कल्पना होती; पण त्यांनी अद्याप अब्बक्काला ओळखले नव्हते, हेच खरे.

राणीने पोर्तुगीज सैन्य उल्लाळच्या दिशेने कोणत्या डोंगररांगा आणि अरण्य तुडवत येणार आहे, याची माहिती मेंढपाळांकडून गोळा करायला सुरूवात केलेली होती. समुद्रकिनाऱ्यावरील तिच्या तटरक्षक नौका आणि किनाऱ्यावर मासेमारी करणारे कोळी पोर्तुगीज जहाजांच्या सर्व हालचाली टिपत होते. सारी माहिती अब्बक्कापर्यंत पोहोचवली जात होती.

नेत्रावती नदीचा मार्गही पोर्तुगीज वापरतील, अशी शंका असल्याने अब्बक्काने नदीमार्गही सुरक्षित करून ठेवला होता. यासाठी आवश्यक ती सैन्यभरतीही करण्यात आली होती. गनिमी युद्धात प्रवीण असणारे तरुण सैन्यात दाखल करण्यात आले होते. त्यांना प्रशिक्षण देण्याचे काम अब्बक्का स्वत: करत होती.

आपली राजधानी स्वतंत्र ठेवणे आणि शेजारच्या सत्ताही स्वतंत्रच कशा राहतील, हे पाहण्याची खबरदारी ती घेत होती. मंगलोरचा राजा तिचा माजी पती असला, तरी तो त्याच्या चंचल स्वभावामुळे पोर्तुगीजांचा जवळपास आश्रित झालेला होता आणि नेमके हेच राज्य तिच्या अगदी शेजारी होते. याच वर्षी पोर्तुगीजांनी मंगलोरलाही लुटायचा उद्योग केला होता. लक्ष्मप्पा आरासाची स्थिती बिकट होती. त्याने प्रतिकाराचा विचार न करता पोर्तुगीजांच्या समोर नांगी टाकली होती आणि तीच चिंतेची बाब असली, तरी अब्बक्काने कठोरपणे हे आव्हान पेलायचे ठरवले होते आणि अपेक्षेप्रमाणे पोर्तुगीज जहाजे उल्लाळच्या दिशेने निघाली आहेत ही बातमी तिला समजली. समुद्रकिनाऱ्याने पायदळ सैन्यही निघाले आहे ही वार्ता मेंढपाळांनी अब्बक्कापर्यंत पोचवली. तातडीने

अब्बक्काने आपली व्यूहरचना केली.

हे युद्ध उल्लाळच्या बंदरात आणि उल्लाळ शहरात न होऊ देता दूरच्या अंतरावर लढण्याचा निर्णय तिने घेतला. त्यानुसार तिच्या लढाऊ नौका आणि सैन्य उल्लाळपासून पाच किलोमीटर अंतरापर्यंत दूर जाऊन शत्रूची वाट पाहू लागले.

या वेळेस अब्बक्काने व्यापारी जहाजांवरचे खाजगी रक्षक सैन्यही आपल्या दिमतीला घेतले होते. अरण्य पायाखाली घालणारे किनारपट्टीवरील सैनिकही तिची जमेची बाजू होती आणि महत्त्वाचे म्हणजे या युद्धाचे नेतृत्व तीच करत होती. तिच्या सैन्यात बंट जमातीच्या लढाऊ स्त्रियांचाही भरणा होता.

पहाटेच्या सुमारास पोर्तुगीज जहाजे किनाऱ्या-किनाऱ्याने उल्लाळच्या दिशेने जाताना दिसली. उल्लाळच्या लढाऊ नौका उथळ समुद्रात शांतपणे शत्रूच्या जहाजांना जवळ येऊ देत होत्या. पोर्तुगीज जहाजांनी कोणाला कळू नये म्हणून जहाजांवर प्रकाशाची सोयही ठेवलेली नव्हती.

पण समुद्रावरच जीवन घालवलेल्या उल्लाळच्या नाविकांना लाटांची जरा गाज बदलली, तरी ती का, हे कळायचे. त्यामुळे ते जहाजे जवळ येताच सावध झाले आणि सावकाशपणे त्या आक्रमक जहाजांना वेढा घालू लागले. तोवर किनाऱ्यावरून येणारे पायदळ पोर्तुगीज सैन्यही अब्बक्काच्या टप्प्यात आले होते. सर्वांनी आपापले धनुष्य ताणले. अब्बक्का अंधारात झाडाच्या फांदीवर बसली होती. ती घारीच्या दृष्टीने सभोवतालचे निरीक्षण करत होती.

तिने पहिला सैनिक झाडीतून उगवताच सप्पकन बाण सोडला. तो सैनिक या अचानक हल्ल्याने कोसळून पडला. अब्बक्काचे बाकीचे सैनिकही बाणांचा वर्षाव करू लागले. अनेक पोर्तुगीज त्या शरवर्षावातच ठार झाले. बाकीचे सैनिक आता सावध होऊन पुढे सरकू लागले. बंदुका गरजू लागल्या. अब्बक्काने तलवार उपसली आणि शत्रूवर धाव घेतली. घमासान लढाई सुरू झाली. तिकडे समुद्रात पोर्तुगीजांचे एक जहाज आगीने वेढले गेलेले दिसले. त्यामुळे पोर्तुगीज सैन्यही हवालदिल झाले. लढावे की पळावे हा संभ्रम त्यांच्या मनात निर्माण झाला आणि तो प्रश्नही पहाट व्हायच्या वेळेसच निकालात निघाला; कारण पोर्तुगीज जहाजेही घाबरून मागे फिरली होती.

पायदळ सैनिकांनीही तोच मार्ग पकडला आणि माघार घेत पळायला सुरुवात

केली. अब्बक्काने काही वेळ त्यांचा पाठलाग केला, पण पोर्तुगीज एवढे जीव खाऊन पळाले की, अब्बक्काने त्या भेकडांचा नाद सोडला आणि आपले सैन्य गोळा करून उल्लाळच्या दिशेने वाटचाल सुरू केली.

अब्बक्काच्या लढाऊ नौकाही किनाऱ्याला लागून जर शत्रू पुन्हा आलाच तर

प्रतिकाराच्या तयारीत थांबलेल्या होत्या.

उल्लाळ शहरात आणि बंदरावर या युद्धाची खबर पसरली, ती दुसऱ्या दिवशी. पोर्तुगीजांचा हल्ला आपल्या राणीने परस्पर निपटला, शहराला आणि बंदराला कसलीही

क्षती पोहोचू दिली नाही, याचेच सर्वांना कौतुक होते. आपल्या राणीबद्दलचा त्यांचा आदर शतगुणित झाला असल्यास नवल नाही.

ही वार्ता काही दिवसात अवघ्या किनारपट्टीवर पसरली. नायक, नायर राजे आणि पोर्तुगीजांसमोर काही न चालणाऱ्या झामोरिननेही तिला अभिनंदनाचे संदेश पाठवले. पोर्तुगीज वर्चस्व हटवण्याची सर्वांची अनात्रिक इच्छा अब्बक्काने पूर्ण केली होती.

आता एकत्र येत तिला सहकार्य करण्याची निकडही सर्वांना वाटू लागली. अब्बक्का मात्र शांतपणे आपल्या प्रजाहिताच्या कामांकडे पुन्हा लक्ष पुरवू लागली.

पोर्तुगीज या जबरी झटक्यामुळे धास्तावून गेले होते. या युद्धसज्ज राणीला कसे हरवता येईल या प्रश्नाने त्यांना भेडसावून सोडले. त्यामुळे त्यांनी फोडा आणि झोडा या सुत्राचा अवलंब करण्याचे ठरवले. गोवा, दीव-दमन आणि कालिकत-कोचीच्या प्रदेशातील त्यांच्या वसाहती सुसज्ज करण्याकडे त्यांनी अधिक लक्ष पुरवायला सुरुवात केली. हिंदू प्रजेवरील अत्याचार वाढले. व्यापारातील आपला वाटा वाढवण्यासाठी पोर्तुगीज प्राणपणाने प्रयत्न करू लागले.

तरीही त्यांना कोठे ना कोठे उठावाचा सामना करावा लागत होता. युद्धे केले जात होती. देशी युद्धांत आधुनिक कवायती सैनिकांचा पुरवठा करण्याचा आणि स्थानिक सत्तांच्या कारभारातही हस्तक्षेप करण्याची नवीनच पद्धत पोर्तुगीजांनी शोधून काढली. भविष्यात हीच पद्धत इंग्रज, फ्रेंच आणि डचही वापरणार होते. देश एक दिवस पारतंत्र्यात जाणार होता. पण कोणालाही त्याचे भान नसल्याच्या काळात अब्बक्का मात्र स्वातंत्र्यसूर्य म्हणून तळपू लागली होती. पोर्तुगीजांनी अब्बक्काला नमवण्यासाठी आणि तेही नाही जमले तरी तिच्याशी किमान मैत्री तरी साध्य करण्यासाठी अनेक प्रयत्न केले. अगदी छोटे-मोठे हल्ले करण्याचा किंवा उल्लाळ बंदरातून जाणाऱ्या जहाजांना लुटण्याचा आणि एकदा तर नेत्रावती नदीतून आक्रमण करण्याचा प्रयत्न केला.

पण हे सारे प्रयत्न अब्बक्काने अयशस्वी ठरवले. ती जगभरात Fearless Queen (निर्भय राणी) म्हणून ओळखली जाऊ लागली. पोर्तुगीज हे हताशपणे पाहत असले तरी त्यांचा कुटील दिमाग जोमाने कामाला लागलेला होता.ते उल्लाळवर आता सारे सामर्थ्य एकवटून हल्ला करणार होते. त्यासाठी ते योग्य वेळ आणि संधीची वाट पाहत होते.पण अजून ते धक्क्यातून सावरलेले नव्हते. पोर्तुगीज आरमारी सत्तेची इभ्रत जगाच्या वेशीवर टांगली गेलेली होती!

७. उल्लाळवरचा भीषण हल्ला

पोर्तुगीज काही काळ शांत बसले असल्यासारखे वाटत असले, तरी ते खरे नव्हते. त्यांनी किनाऱ्यावरील सत्तांशी संबंध वाढवायचे आणि त्यांना आमिषे किंवा धाक-धपटशा दाखवून आपल्या नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न सुरूच ठेवले होते. इतक्या वेळा यांना धडा शिकवला असला तरी ते आज ना उद्या आपल्यावर आक्रमण करणारच, याची अब्बक्काला खात्री होती.

त्यामुळे ती प्रजेच्या हिताची अनेक कार्ये करत असतानाच आपली संरक्षण यंत्रणाही मजबूत करत होती. ती शेजारच्या राज्यांशी नियमित संपर्क ठेवून त्यांचाही उत्साह कसा वाढेल, हे पाहत होती. तीने अगदी आपला माजी पती लक्ष्मप्पा यालाही

पोर्तुगीजांना बंगा राज्यात गरजेपेक्षा अधिक ढवळाढवळ करू न देण्याबाबत लिहीत होती.

शेवटी मंगलोर हे शेजारचेच बंदर होते आणि तेही आता भरभराटीला आलेले होते. फरक एवढाच होता की, आता तिथला व्यापार पोर्तुगिजांच्या हाती गेला होता. त्यात काही तरी नियंत्रण आणावे, अशी मागणी ती सातत्याने करत होती. आजवर उल्लाळवर झालेले सारे हल्ले मंगलोर बंदरातून झालेले होते.

लक्ष्मप्पा मात्र आता बांघेर या बंगा आरासा घराण्याच्या जुन्या राजधानीच्या गावी असलेल्या किल्ल्यात राहायला गेला होता, तर मंगलोरचा किल्ला पोर्तुगिजांच्या कब्जात गेलेला होता. पोर्तुगीजांनी तेथे आपले लष्करी बळ वाढवायला सुरुवात केलेली होती. तसेच नवीन तटबंदीयुक्त किल्ला बांधून आपल्या बंदराची सुरक्षितता वाढवायलाही सुरुवात केली होती. या सर्व घटनांकडे सावधपणे पाहत असताना ती स्वत:ही तिरंदाजी, तलवारबाजी आणि घोडेस्वारीचा सराव नियमित करत होती. तिचा उत्साह आजही तोच होता. आपले सैन्यदल आणि हेरखाते नेहमी सावध राहील, याची तिने चांगलीच खबरदारी घेतलेली होती. सोमेश्वर मंदिराच्या जीर्णोद्धाराचे कामही तिने हातात घेतलेले होते. व्यापाऱ्यांच्या सोयीसाठी माल साठवणुकीची नवी गोदामेही उभारायला सुरूवात झाली होती. ती येथेच थांबली नाही. आपल्या राज्यातील प्राचीन जैन मंदिरांचाही जीर्णोद्धार आणि विकास तिने हातात घेतला. त्याच वेळेस अर्धमागधी भाषेतील जैन साहित्य तिने तुळू भाषेत अनुवाद करू घ्यायला सुरूवात केली. त्यामुळे जैन विद्वानांचाही वावर उल्लाळमध्ये वाढला. तत्त्वचर्चा रंगू लागल्या. अब्बक्का उत्साहाने त्या चर्चांमध्ये सामील होत असे. हां हां म्हणता १५६८ साल आले. मान्सून नुकताच ओसरला होता. समुद्र आता शांत झाला असला, तरी किनारपट्टीवर अजूनही दमट वारा वाहत होता.

समुद्र शांत असला, तरी ती रात्र भयंकर होती. रात्रीचा मिट्ट काळोख दाटलेला होता. किनाऱ्यावरील गस्तीनौका आणि कोळी मात्र समुद्रात बारकाईने लक्ष ठेवून होते. मध्यरात्रीच्या सुमारास चांदण्यांच्या धूसर प्रकाशात समुद्रावरून येणाऱ्या काही सावल्या प्रथम कोळ्यांच्या नजरेत आल्या. दूरवर काळोखात हालणारे ठिपके म्हणजे चोरटा हल्ला करायला आलेला पोर्तुगीज ताफा आहे, हे त्यांच्या एका क्षणात लक्षात आले; कारण ही जहाजे नेहमीच्या व्यापारी लयीत येत नव्हती. त्यांचा मार्ग थेट बंदराच्या दिशेने येत

नव्हता. ते पुढे न येता आता थोडे दूर थांबले होते. ही नक्कीच धोक्याची बाब होती.

अब्बक्काला ही माहिती ताबडतोब कळवण्यात आली. अब्बक्का जागीच होती. ती तशीही कधीच निर्धास्त झोपत नसे. उल्लाळचा प्रत्येक श्वास ऐकू यावा, या जागृतीनेच ती विश्रांती घेत असे. तिची ही सवयच बनून गेली होती. ती तातडीने किल्ल्याच्या तटावर आली. खाली अंधारात समुद्र हेलकावत होता. दूरवर धूसर प्रकाशात पोर्तुगीज जहाजांच्या भव्य काळ्या आकृत्या डोलत होत्या.

तिच्या तत्काळ लक्षात आले की, हा पोर्तुगीजांचा हल्ला आहे. ती मुळातच निर्भय होती. 'ते सरळ बंदरावर येणार नाहीत, ती शांतपणे स्वत:शीच म्हणाली. ते नौकांतून उतरणार आहेत.' हे लक्षात घेऊन तीही प्रतिकारासाठी तत्काळ सज्ज झाली. या वेळेस पोर्तुगिजांच्या या मोहिमेचे नेतृत्व एक धाडसी, पण अहंकारी अधिकारी करत होता. त्याचे नाव होते जोआओ पेक्सोटो. त्याची योजना त्याच्या दृष्टीने साधी असली, तरी होती मात्र कपटी. ही मोहीम ठरवली होती ती पोर्तुगीज व्हाईसरॉय एन्टोनिओ नरोन्हा या कसलेल्या राजकारणी माणसाने. पेक्सोटोच्या दृष्टीने उल्लाळच्या बंदराला दीर्घ वेढा घालण्यात अर्थ नव्हता. तसे केले तर अब्बक्काचे आरमार कसा हादरा देते, हा त्याने अनुभव घेतलेला होता आणि अब्बक्काची ताकद जशी समुद्रात होती, तेवढीच किनारपट्टीच्या भूगोलात आणि तिच्याप्रती असलेल्या स्थानिकांच्या निष्ठेत होती. म्हणून त्याने ठरवले होते की थेट मोठ्या तोफांचा मारा न करता किनाऱ्यावर निवडक सैनिक उतरवायचे आणि बंदर टाळून रात्रीच्या अंधारात शहरात शिरायचे. राजवाडा काबीज करून अब्बक्काला ठार मारायचे किंवा कैद करायचे आणि पहाटेपर्यंत उल्लाळ पडले अशी घोषणा करायची आणि या वेळेस त्याच्या सोबत स्थानिक वाटाडे होते आणि त्यांना उल्लाळ शहराची खडा न खडा माहिती होती.

थोडक्यात, पेक्सोटो जय्यत तयारी करून आलेला होता. त्याचा उद्देश उल्लाळ राज्याचा अंत करणे हा होता. त्यासाठी त्याने आवश्यक ती पूर्वतयारी केलेली होती. त्याने अनेक स्थानिक लोक आधीच विकत घेऊन ठेवले होते. अर्थात, त्याला बराच काळ लागला असल्याने या आक्रमणालाही उशीर झाला होता.

अब्बक्काने अशी स्थिती आली तर काय करायचे, हे आधीच ठरवून ठेवले होते. त्यामुळे तिने या वेळेस सागरी युद्ध करायचे नाही, शत्रूला बिनबोभाट उल्लाळमध्ये घुसू

द्यायचे आणि मगच प्रतिकाराला सुरुवात करायची असे ठरवले होते. यामुळे घरभेदी कोण आहेत हेही उजेडात येईल हा तिचा विश्वास होता.

त्या रात्री कसलाही प्रतिकार न होता काळोखात काही पोर्तुगीज नौका किनाऱ्याला लागल्या. आठशे ते एक हजार कवायती युद्धात प्रशिक्षित असे पोर्तुगीज सैनिक होते. त्यांच्याबरोबर स्थानिक वाटाडे होते की नाही, यावर मात्र इतिहासकारांमध्ये मतभेद आहेत; पण इतके निश्चित आहे की त्यांना मार्गदर्शन मिळाले नसते, तर त्या घोर अंधारात अपरिचित दलदलीत, अरुंद वाळूपट्ट्यांत आणि चिखलमय किनाऱ्यातून इतक्या नेमकेपणाने आत शिरणे अवघड गेले असते. म्हणजे कोणीतरी स्थानिक वाटाडे त्यांच्या सोबत होते, हे अनुमान करायला काहीच हरकत नाही.

पेक्सोटोच्या निवडक तुकडीने जलद गतीने पुढे सरकायला सुरुवात केली. ते किनाऱ्याच्या रेषेने कडेने न जाता, थोडे आतून, झाडाझुडपांच्या आड, खाडीच्या कडेने पुढे आले. त्यांना खात्री होती की, अब्बक्का अजून परिस्थितीचा अंदाज घेत असेल. तिला आणि उल्लाळ शहराला काही कळण्याच्या आत्ताच अचानक हल्ला झाला, तर त्या अचानक धक्क्याने शहर गोंधळून आणि घाबरून जाईल, असे त्यांना वाटत होते; पण त्यांचे दुर्दैव. अब्बक्का आणि उल्लाळ गाफील नव्हते. अब्बक्काच्या हेरांनी, कोळ्यांनी, किनाऱ्यावरील पहाऱ्यांनी, आणि किल्ल्यावरील अग्नी–संकेतांनी संपूर्ण शहराला सावध केले होते. फरक एवढाच की पूर्वीच अशा स्थितीत काय करायचे हे सर्व नागरिकांना माहित असल्याने शहरात कसलाही आरडाओरडा नव्हता. सगळे शांत होते. श्वास रोखून काय घडते याची वाट पाहत होते आणि ती शांतता पेक्सोटोला विजयासारखी वाटली. प्रत्यक्षात ती सापळ्याची शांतता होती. कोठेही प्रतिकार न होता पेक्सोटोची तुकडी अखेर उल्लाळच्या किल्ल्यापर्यंत पोचली. आता मात्र पेक्सोटो जरा अस्वस्थ झाला.

आपल्याला कसलाही प्रतिकार नाही याचेच त्याला आश्चर्य वाटत होते. त्यात किल्ल्याबाहेरही फारसा पहारा नव्हता. अब्बक्का एवढी बेसावध कशी? त्याला प्रश्न पडणे स्वाभाविक होते. पोर्तुगीज सैनिक येताच त्या पहाऱ्यावरील सैनिकांनी जुजबी प्रतिकार करून चक्क पळ काढला. पेक्सोटोला हीसुद्धा अपेक्षा नव्हती. राणीच्या मनात आहे तरी काय की खरेच आपण तिला बेसावध गाठले आहे हा प्रश्न त्याला पडला. राणी किल्ल्यातच आहे की नाही हेही त्याला कळेना. तिचा राजवाडा किल्ल्यातच आहे ही

त्याची खात्रीशीर माहिती होती. त्याने आपल्यासोबत निवडक सैनिक घेतले आणि राजवाड्यात प्रवेश केला. आत काही दिवे विझलेले, तर काही मंद उजळलेले होते; पण ना नोकर-चाकर ना राणी अब्बक्का! त्यांनी कसोशीने सर्वत्र शोध घेतला. मानवी वावराच्या खुणा असल्या तरी राजवाड्यात कोणीही नव्हते. आता मात्र पेक्सोटो गोंधळात पडला. अब्बक्का गेली तरी कोठे? तिच्या कैदेखेरीज ही धाडसी मोहीमही अपूर्णच राहील हे त्याला माहीत होते. मग त्याने साऱ्या शहरात तिला शोधण्याची आज्ञा दिली. रात्रीच सारी घरे तपासण्यात आली. पण अब्बक्का कोठेच नव्हती...ना तिचे सैन्य होते. हे सैन्य आसपासच्या अरण्यात लपून आपल्यावर अचानक पलटवार करण्याची वाट तर पाहत नाही ना, असाही प्रश्न पेक्सोटोला पडला.

त्याने काही सैन्य किल्ल्यात ठेवले, तर बाकीचे सैनिक एका मैदानात जमा केले आणि शत्रू दिसत नसतानाही प्रतिकाराची अंदाजे तयारी करायला सुरुवात केली. आपल्यावर बंदराच्या बाजूने हल्ला होऊ शकेल, असा त्याचा प्राथमिक अंदाज होता; पण राणी अब्बक्का त्या वेळेस उल्लाळ शहराजवळच्या एका वस्तीतील मशिदीत आलेली होती.

किल्ल्यात थांबलो तर तेथे जे युद्ध होईल, त्याचा त्रास शहरातील नागरिक आणि देशी-विदेशी प्रवासी आणि व्यापाऱ्यांना होणार, याची तिला जाणीव होती आणि तिला नेमके तेच नको होते. त्यासाठीच किल्लाही तिने शत्रूच्या हाती अगदी सहज जाऊ दिला होता. शत्रू आपसूक चकला होता आणि ती सर्व सहकाऱ्यांना संदेश पाठवून गुप्तपणे त्या मशिदीत आलेली होती, ती पोर्तुगीजांना कायमचा धडा शिकवण्यासाठी! मशिदीच्या अंगणात त्या तेलदिव्यांच्या मंद उजेडात, कोळी, मोपले नावाडी, तुळू योद्धे, नायर योद्धे आणि जैन सेनानी, सगळे जमा झाले होते. सारे आता राणीच्या आदेशाची वाट पाहत होते. शहरातील खबरी पोर्तुगीज सैनिकांच्या सर्व हालचालींची इत्थंभूत माहिती राणीपर्यंत पोहोचवत होते.

पहाट होत आली तरी पेक्सोटोच्या अपेक्षेप्रमाणे कोठूनच कसलाही हल्ला आला नाही. आता त्याला वाटले की, काम संपले. आता किमान उल्लाळचा किल्ला आणि सारे शहर त्याच्या ताब्यात होते. घाबरून पळालेली राणी अब्बक्का आज ना उद्या सामोरी येईलच असा विश्वास त्याला होता; पण त्याचा मद लवकरच तुटणार होता.

तो आता आपल्या सैन्याला उल्लाळ शहर आणि बंदरावरील गोदामे लुटण्याची आज्ञा देणार तेवढ्यात अंधारातून त्यांच्यावर बाणांचा वर्षाव सुरू झाला. त्याचे काही सैनिक कोसळून पडले. हल्ला कोठून झाला, हेही कळत नव्हते; कारण अब्बक्काचे योद्धे घरांच्या छतांवरून, झाडांवरून, तर गल्ली-बोळांतून असे चारी बाजूने, पण स्वत:ला लपवून शरवर्षाव करत होते आणि पेक्सोटोचे सैन्य मात्र मैदानात होते. उघड्यावर...असे की, शत्रूला खुले लक्ष्य मिळावे!.

पोर्तुगीज सैन्यात गोंधळ माजला. त्यांनी बंदुकांच्या अंदाधुंद फैरी झाडल्या, खऱ्या पण निशाणाच नव्हता, तर गोळ्या वाया जाण्यापलीकडे दुसरे काही होऊ शकत नव्हते.

पेक्सोटोने सैन्याला सुरक्षित जागा घेण्याचे आदेश दिले. शिस्तबद्ध पोर्तुगीज सैनिक बाणांचा वर्षाव टाळण्यासाठी बेशिस्त झाले. त्यांच्यात आता घबराट पसरली होती. स्वत: पेक्सोटोही सुरक्षित जागेच्या शोधात धावला; पण ते चारी बाजूंनी घेरले गेलेले होते.

आता अब्बक्का आडोसा सोडत एक तुकडी घेत मैदानात सरसावली. भाले, बांबूचे लांब दांडे, तलवारी घेऊन आलेले ते सैन्य बेभान होऊन पोर्तुगीज सैन्यावर तुटून पडले. पोर्तुगीज सैनिक त्यांच्या दिशेने बंदुका वळवू पाहत होते, पण इतक्या जवळ आलेल्या शत्रूवर गोळ्या झाडणेही अशक्य झाले. तोवर एक तुकडी किल्ल्यात घुसलेल्या पोर्तुगीज सैनिकांवर तुटून पडली होती. किल्ल्याच्या आत भीषण रणकंदन सुरू झाले होते. किल्ल्याची दारे अब्बक्काच्या सैनिकांना बंद करून टाकलेली होती. त्यामुळे पळून जायलाही पोर्तुगीजांना कोणती जागा शिल्लक नव्हती. एवढे युद्ध लढत असूनही अब्बक्काच्या शिस्तीतील सैन्याने कसलाही रणघोष केला नाही.

उल्लाळमधील नागरिक सुरक्षित अंतरावरून हे भीषण युद्ध पाहत होते. मनोमन आपल्या राणीची तारीफ करत होते. पेक्सोटो मात्र हतबुद्ध झाला होता. आता काय करावे, हेच त्याला समजेना. आता सारी परिस्थिती त्याच्या हाताबाहेर गेली होती. त्याने आपल्या सैनिकांना सावरण्याचा प्रयत्न केला. किल्याच्या दिशेने धाव घ्यायला सांगितले, पण उशीर झाला होता; कारण स्वत: अब्बक्काराणी घोड्यावर स्वार होऊन त्याच्यासमोर आली. तिच्या अंगावर हलक्या वजनाचा, पण योद्ध्यास शोभेल असा

पोशाख होता. तिच्या कमरेला कट्यार, उजव्या हातात तलवार, तर डाव्या हातात ढाल होती आणि एक धनुष्य अजूनही तिच्या खांद्यावर होते.

पहाटेच्या प्रकाशात भयचकित झालेल्या पेक्सोटोने तिला ओळखले. त्याच्या चेहऱ्यावर अविश्वास उमटला. जिला त्याने पळवून लावले असे तो समजत होता, ती राणी आता समोर उभी होती– आणि तिच्या मागे तिचे लढाऊ सैनिक.

अब्बक्का आता तलवार उभारून घोड्यावरून खाली उतरते आहे, हे पाहताच शेवटचा प्रयत्न म्हणून त्याने बंदूक उचलण्याचा प्रयत्न केला; पण त्याच्या आतच अब्बक्काची तलवार त्याच्या मस्तकावर कोसळली. त्याच्या मस्तकाची भकले झाली.

राणी रक्ताने न्हाऊन निघाली. तुळू लोकपरंपरेने हा इतिहास जपून ठेवला आहे. त्या रात्री पेक्सोटो मारला गेला. त्याला स्वत: राणी अब्बक्काने ठार मारले आणि उल्लाळवर केलेल्या विश्वासघातकी हल्ल्याचा सूड घेतला.

त्या पहाटे त्याच्यासह त्याची बरीच तुकडी कापली गेली. मोजके काही सैनिक जीव वाचवण्यासाठी किनाऱ्याकडे धावू लागले. त्यांतील काहींना रस्त्यातच घेरले गेले. काही समुद्रापर्यंत पोहोचले, पण तिथे किनाऱ्यावरून झालेल्या नौसैनिकांच्या प्रतिहल्ल्यात मारले गेले. उल्लाळ जिंकून घेणे आणि अब्बक्का राणीला जिवंत कैद करण्याचे स्वप्न जळून खाक झाले. किल्ला सुरक्षित होता, राजवाडा सुरक्षित होता आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, उल्लाळ सुरक्षित होते. किल्ल्यात आणि उल्लाळच्या रस्त्यांवर पोर्तुगीज सैनिकांचे मृतदेह विखुरलेले होते; पण पोर्तुगीज जहाजे अजूनही समुद्रात उभी होती...पेक्सोटो आणि विजयी सैन्याची वाट पाहत मात्र राणीने लगेच आदेश दिल्याप्रमाणे उल्लाळचे नौसैनिक आपल्या नौकांतून त्या जहाजाच्या दिशेने झपाट्याने निघाले.

विजयाच्या दुंदुभीची वाट पाहत असलेल्या त्या जहाजांवर त्यांनी एवढ्या त्वेषाने हल्ला चढवला की, पाहता पाहता ती पेटू लागली. सकाळच्या प्रकाशात हा आगडोंब मिसळून गेला. सर्वत्र धूर पसरला.

या हल्ल्यात जहाजांवरील सत्तर पोर्तुगीज नौसैनिक ठार झाले असे पोर्तुगीज रेकॉर्डस् सांगतात एवढा हा हल्ला भीषण होता. थोडक्यात, पळून जाणाऱ्या पोर्तुगीज सैनिकांना परतीचा मार्गही राहिला नाही. दोन्ही जहाजे बुडाली. उल्लाळच्या किनाऱ्यावरून हजारो रहिवासी हे दृश्य पाहत होते. थरारक रात्रीचा शेवट असा महाविजयात बदलला होता.

सर्व उल्लाळ शहरात विजयोत्सव किती उत्साहात साजरा केला गेला असेल, याची आपण आज कल्पना करू शकतो. आपल्या विलक्षण युद्धनीतीने मिळवलेला हा महान विजय केवळ तुळूनाडूच नव्हे, तर राष्ट्रीय इतिहासाचा एक अद्वितीय अध्याय आहे. सामर्थ्यशाली पोर्तुगीजांना असला भीषण धडा कोणी शिकवला नव्हता.

सुरुवातीच्या हल्ल्याने काही प्रमाणात किल्ल्याची हानी झाली होती; पण पोर्तुगीजांना उल्लाळवर निर्णायक कब्जा प्रस्थापित करता आला नाही. राणीच्या

मध्यरात्रीच्या पलटवाराने त्यांचा डाव उधळून लावला. राणीची कीर्ती शिखराला जाऊन पोचली. ती पोर्तुगीज वर्चस्वाला उघड आव्हान देणारे प्रतीक बनली होती.

या विजयाचे परिणाम:

या आणि आधीच्या पराभवांनी पोर्तुगीज समूळ हादरले. त्यांच्या आता लक्षात आले की, अब्बक्का फक्त किनारी शासक नाही तर ती युद्धकुशल असून तिला प्रजेचा भक्कम पाठिबा आहे.

ती केवळ प्रतीकात्मक राणी नाही तर ती खरेच महान सेनानी आणि कुशल शासनकर्ती आहे.

ती फक्त प्रतिकार करत नाही, तर ती युद्धाचे नियम बदलते.

तिने दाखवून दिले की,

मोठ्या जहाजांवर लहान नौका मात करू शकतात, तोफांवर भूगोल मात करू शकतो, परकीय कवायती सैनिकांवर स्थानिक गनिमी काव्याचे तंत्र मात करू शकते, आणि सर्वांत महत्त्वाचे–स्वातंत्र्याची भावना ही सर्व प्रकारच्या भीतीवर मात करू शकते.

उल्लाळचा हा विजय लष्करी तर होताच, पण त्याहून अधिक तो मानसिक डावपेचांचा विजय होता. या विजयामुळे अब्बक्काची 'निर्भय राणी' ही प्रतिमा जगभर उंचावली.

पण उल्लाळमधील विजयामुळे अब्बक्का राणी संतुष्ट झाली नाही. पोर्तुगीज पुन: पुन्हा असेच प्रयत्न करत राहतील, हा धोका होताच. आता संरक्षण नव्हे, तर आक्रमण हाच सर्वोत्तम बचाव, हे धोरण ठेवून तिने लगोलग मंगलोरवर हल्ला चढवायचा धाडसी निर्णय घेतला आणि तशी लगेच तयारीही केली.

***

८. मंगलोरवर हल्ला...पोर्तुगीजांचे पलायन

इ. स. १५६८ हे वर्ष राणी अब्बक्काच्या संघर्षकथेतील सर्वांत ज्वालाग्रही वर्ष मानले जाते. या वर्षानेच अब्बक्काला अभूतपूर्व कीर्ती प्राप्त करून दिली; कारण हे लढे पोर्तुगीजांच्या वर्मावरील आघात होते.

उल्लाळची ही राणी याआधीच पोर्तुगिजांना खंडणी नाकारून, त्यांच्या व्यापारी मक्तेदारीला आव्हान देऊन आणि स्थानिक अरब-मुस्लीम, तसेच मोपला व्यापाऱ्यांशी संबंध टिकवून त्यांना दुखावून बसली होती. आधीचे सारे हल्ले तिने यशस्वीरीत्या परतवून लावलेले होते. पोर्तुगीजांची पुरेशी नाचक्की तिने केलीच होती. आता पोर्तुगीजांसाठी अब्बक्का ही केवळ एक हट्टी स्थानिक राणी नव्हती, तर ती त्यांच्या पश्चिम

किनाऱ्यावरील सत्ताधोरणाला, विशेषतः मसाल्यांच्या समुद्री व्यापारावरील नियंत्रणाला, थेट आव्हान देणारी धोकादायक शक्ती बनली होती. त्यामुळेच गोव्यातील पोर्तुगीज सत्तेने तिच्याविरुद्ध निर्णायक मोहीम उभारण्याचा निर्णय घेतला होता आणि त्याचीच परिणती उल्लाळवरील जोआओ पेक्सोटोच्या नेतृत्वाखालील विश्वासघातकी हल्ल्यात झाली होती.

त्याची रणनीती स्पष्ट होती–रात्री किनाऱ्यावरील पहारे चुकवत उल्लाळमध्ये घुसायचे, राणीला जिवंत पकडायचे किंवा ठार मारायचे आणि मंगळूर–उल्लाळ या दोन्ही किनारी केंद्रांवर आपला लष्करी व व्यापारी दबदबा निर्विवाद करायचा.

पण राणीने आपले चातुर्य वापरत पेक्सोटो आणि त्याच्या सैन्याला गाफील करत, विजयाचा खोटा आभास देत अशी काही पोर्तुगीजांच्या पेकाटात लाथ घातली होती की, पेक्सोटो तर मारला गेलाच; पण शेकडो पोर्तुगीज सैनिकही ठार मारले गेले. उल्लाळवरील हा हल्ला पूर्ण अयशस्वी झाला होता.

जगले–वाचलेले सैनिक पराभवाची बातमी द्यायला पोहोचण्याच्या आतच मंगलोर बंदर आणि तेथे पोर्तुगीजानी नव्यानेच बांधलेल्या किल्लेवजा संरक्षक तटबंदीवर हल्ला करून पोर्तुगीजांना अजून एक जोरकस धक्का द्यायचा होता. त्यामुळे हा विजय मिळवून राणी थांबली नाही.

तिने अत्यंत वेगाने आपले विश्वासू सैनिक, निष्ठावंत स्थानिक योध्दये समुद्रमार्गाची जाण असलेले सहकारी, तसेच तिच्या बाजूने उभे असलेले मुस्लीम लढवय्ये आणि किनारपट्टीवरील स्थानिक जमातीतील योद्धयांना एकत्र केले.

काही लोकपरंपरांत या सैन्याची संख्या सहा हजार इतकी दिली जाते आणि ती अतिशयोक्ती आहे असे म्हणता येत नाही. अर्थात, नक्की संख्या काय, याचा आकडा सर्व समकालीन वा विश्वसनीय स्रोतांत तंतोतंत सापडत नाही.

इतके मात्र स्पष्ट दिसते की, अब्बक्काचा हा प्रतिहल्ला केवळ लहान छापा नव्हता, तर तो पूर्ण योजनाबद्ध, वेगवान आणि धडकी भरवणारा सैनिकी घणाघात होता. उल्लाळच्या रक्तरंजित युद्धानंतर आता तिने संरक्षणात्मक लढाईवर थांबून न राहता हल्ल्याचे केंद्रच बदलले.

पोर्तुगीज जिथून किनारपट्टीवर आपली पकड मजबूत करत होते, त्या मंगलोरकडे

तिने मोर्चा वळवला आणि हेच या संपूर्ण मोहिमेचे लष्करी वैशिष्ट्य होते. एखादा सामान्य स्थानिक शासक असता, तर शत्रूला आपल्या प्रदेशातून परतवून लावले, यातच संतुष्ट राहिला असता; पण अब्बक्काने पुढाकार घेत शत्रूच्या ताब्यातील ठाण्यावर धडक देण्याचा निर्णय घेतला. यामुळे तिची रणनीती केवळ संरक्षणात्मक नव्हती, तर सक्रिय आणि प्रत्युत्तरात्मक होती, हे स्पष्ट होते.

त्या वेळी मंगलोर हे केवळ एक बंदर नव्हते; तर ते पश्चिम किनाऱ्यावरील व्यापार, रसद, नौदल हालचाली आणि पोर्तुगीज प्रभाव यांचे महत्त्वाचे केंद्र होते. या काळात बोलार परिसरात पोर्तुगीजांनी एक किल्लानुमा तळ बांधला होता. हा समुद्राकाठचा स्थिर आणि विशाल किल्ला होता. मंगलोर बंदराला या किल्ल्याचे संरक्षण होते. या किल्ल्याच्या तटावर समुद्राकडे रोखलेल्या असंख्य तोफा होत्या. सशस्त्र सैनिक किल्ल्याच्या तटावरून सतत गस्त घालत फिरत असता. दुर्बिणी असल्याने ते समुद्रात दूरवर निरीक्षण करू शकत.

अब्बक्काचे नाविक दल समुद्रमार्गाने, पण किनाऱ्या-किनाऱ्याने साध्या मच्छीमार नावा वाटाव्यात या पद्धतीने, पण वेगाने निघाले.

समुद्राच्या काठाने दलदल, उथळ समुद्र, खाजनं, दाटलेली नारळबने यांतून अब्बक्कासहित बाकी सैन्य आपापली हत्यारे सज्ज करून वेगाने निघाले.

तिच्या सैन्यात तलवारी, भाले, धनुष्यबाण, अग्निबाण अशी पारंपरिक शस्त्रास्त्रे होती. समुद्रकाठच्या लढाईस अनुरूप असे तिने डावपेचही आखलेले होते. पोर्तुगीजांकडे बंदुका, तोफा आणि तटबंदीचा रक्षणात्मक बंदोबस्त असला, तरी अब्बक्काची बाजू होती-वेग, भूगोलाची जाण, स्थानिक समर्थन आणि अचानक प्रतिहल्ल्याचा धक्का. मंगलोर बंदर आणि किल्ला जवळ येताच नावा किनाऱ्याने शिस्तीत पांगल्या आणि सैनिक जमिनीवर उतरले.

बंदरावर त्या वेळेस व्यापारी जहाजे भरली जात होती, त्यामुळे हमाल आणि व्यापारी यांचा मोठा गलबलाट होता. किल्ल्यावरील सैनिक तिकडे बारकाईने लक्ष ठेवून होते. ते समुद्राकडे पाहत असले, तरी त्यांचे लक्ष खोल समुद्राकडे असल्याने झाडीआड किनाऱ्याने काय चाललेय, याची त्याना भनकही लागणे शक्य नव्हते.

अब्बक्का काही क्षण जंगलाचा आडोसा घेऊन उभी राहिली. आपले नौसैनिक

किनाऱ्याला लागले आहेत हे पाहताच तिने एक अग्निबाण किल्ल्याच्या दिशेने सोडला. हाच नौसैनिकांना इशारा होता. तत्क्षणी अब्बक्कानेही घोड्याला टाच मारली. घोडा उसळून पुढे झेपावला. मागोमाग तिचे सैन्य होतेच. दोन बाजूंनी असा हल्ला अचानक

झाल्याने पोर्तुगीज गोंधळून गेले.

एडमिरल मस्करहान्स हा अधिकारी किल्ल्याचे रक्षण करायला तैनात होता. त्याने हा अचानक हल्ला येताच धक्क्यातून सावरून प्रतिकाराचे आदेश दिले. पण अब्बक्का आणि तिचे सैन्य किल्ल्याच्या एवढ्या जवळ आलेले होते की, तोफा निरुपयोगी ठरल्या.

किनाऱ्यावरून आलेले सैनिक अब्बक्काचे बंदरावरील पोर्तुगीज कर्मचारी आणि सैनिक यांचा निकाल लावून किल्ल्याच्या प्रवेशद्वाराकडे धावले.

पोर्तुगीज नेटाने दार बंद करण्याचा प्रयत्न करत होते, पण त्यांनी असा काही भीषण हल्ला चढवला की, पोर्तुगीजांना आपले प्रयत्न सोडून आत पळावे लागले.

बंगलोर किल्ल्यात राणीच्या सैन्याचा झंझावाती प्रवेश झाला आणि आत घमासान युद्ध सुरू झाले. अब्बक्काही तलवार उभारून, घोड्यावर स्वार होऊन, किल्ल्यात शिरली. पोर्तुगीज सैनिक एडमिरल मस्करहान्सच्या नेतृत्वाखाली प्रखर प्रतिकार करू लागले; पण अब्बक्का आणि तिच्या सैन्याने तो मोडून काढला. दोन घटिकांच्या या तुंबळ युद्धात शेकडो पोर्तुगीज सैनिक मारले गेले. एडमिरल मस्करहान्स तरीही धीराने लढत होता, पण राणी अब्बक्काने भाला फेकून त्याच्या छातीचा वेध घेतला.

तो जागीच ठार झाला. राणी अब्बक्काने अजून एका महाविजयाची गाथा लिहिली. पोर्तुगीजांचा बचाव पुरेपूर मोडला गेला. त्यांच्या तुकड्यांना तटबंदी सुरक्षित करणे कठीण होऊन गेले. अनपेक्षित हल्ला झाल्याने रसद, मनोधैर्य आणि तत्काळ प्रतिकारक्षमता–या तिन्ही आघाड्यांवर ते डळमळले.

याचा परिपाक असा झाला की, पोर्तुगीज सैन्य पळत सुटले. त्यांना मंगलोरचा किल्ला सोडून माघार घ्यावी लागली.

अब्बक्का स्वत: किल्ल्याच्या तटावर गेली आणि तेथील तोफेचे तोंड पोर्तुगीजांच्या आरमारी जहाजांकडे वळवले. दारुगोळा ठासला. बत्ती दिली आणि एकच धडाका झाला व पोर्तुगीज जहाज भगदाड पडून, आग लागून समुद्रात स्वाहा होऊ लागले.

जशा पोर्तुगीजांच्या आशांनाच तिने भगदाड पाडले होते आणि जलसमाधी दिली होती. तुम्ही आमच्यावर चालून आलात, तर आम्ही तुमच्यावर चढाई करू आणि अशीच गत करू, असा इशारा देऊन आणि त्या किल्ल्यावर आपले शासन बसवून राणी आपल्या राज्याकडे परत फिरली.

या मोहिमेचे ऐतिहासिक महत्त्व फार मोठे आहे. अब्बक्काने केवळ आपला प्रदेश वाचवला नाही, तर तिने शत्रूला त्याच्या स्वतःच्या सागरी ठाण्यात जाऊन हादरा दिला. पश्चिम किनाऱ्यावर पोर्तुगीज अजेय नाहीत, त्यांना हरवता येते, आणि स्थानिक सत्तांकडे जर इच्छाशक्ती व रणकौशल्य असेल, तर ते त्यांना अरबी समुद्रात शिरूही देणार नाहीत, असा इशारा या घटनेतून दिला गेला.

राणी अब्बक्का म्हणजे सळसळते चैतन्य आणि दुर्दम्य इच्छाशक्तीने आणि

पराक्रमाने विजय खेचून आणणारी दुर्गा, असे वातावरण पसरले नसले तरच नवल!

पण ही विजयकथा दुर्दैवाने कायमस्वरूपी राजकीय उलथापालथ ठरली नाही. पोर्तुगीज साम्राज्याची एक मोठी ताकद म्हणजे, त्यांची पुनर्गठनक्षमता. गोवा, कोची, समुद्री रसदमार्ग, आणि किनारपट्टीवरील त्यांच्या इतर वसाहती व ठाणी यांमुळे ते एक पराभव सहन करून पुन्हा शक्ती एकवटू शकत. तरीही किमान वर्षभर अब्बक्काने आपली सत्ता मंगलोरवर स्थापित केली.

उपलब्ध दुय्यम परंपरेनुसार १५६९ च्या शेवटाच्या सुमारास पोर्तुगीजांनी मंगलोरवरील आपला ताबा पुन्हा प्रस्थापित केला. पण त्यामुळे अब्बक्काच्या विजयाचे महत्त्व कमी होत नाही; उलट हे दाखवते की, अब्बक्काचा विजय हा स्वातंत्र्ययुद्धाच्या एल्गारातील इतिहासातील एक विलक्षण क्षण होता.

मंगलोरवरील हल्ल्याचे खरे महत्त्व केवळ लष्करी नसून, मानसिक आणि प्रतीकात्मकही आहे. अब्बक्का ही केवळ यशस्वी बचाव करणारी राणी म्हणून नव्हे, तर थेट शत्रूच्या किल्ल्यावर धडक देणारी प्रतिआक्रमक शासक म्हणून येथे उभी राहते. तिच्या व्यक्तिमत्त्वातील ही आक्रमक स्वातंत्र्यदृष्टीच तिला इतर अनेक प्रादेशिक शासकांपेक्षा वेगळी बनवते. म्हणूनच मंगळूरवरील १५६८ चा हल्ला हा तिच्या चरित्रातील केवळ एक लढाई नसून, तो तिच्या राजकीय इच्छाशक्तीचा, समुद्री व्यापाराच्या प्रश्नावरच्या तिच्या भूमिकेचा आणि पोर्तुगीज साम्राज्याला तिने दिलेल्या उघड आव्हानाचा सर्वोच्च बिंदू मानता येतो.

पोर्तुगीज या हल्ल्याने एवढे हादरले की, काही काळ ते बधीरच झाले. जसे ते सावरले तसे आता काहीही करून राणी अब्बक्काचा नाश केला पाहिजे, यासाठी वेगवेगळ्या योजना आखू लागले. ही जिवंत आहे तोवर आपण येथे पाय रोवू शकत नाही, याची त्यांना खात्री पटलेली होती. अब्बक्काराणीला युद्धात जिंकता येणे शक्य नाही...मग?

कट-कारस्थान-विश्वासघात हा एकमेव मार्ग त्यांच्यापुढे शिल्लक होता आणि त्यांनी त्या दृष्टीने जाळे पसरवायला सुरुवात केली आणि या देशात विश्वासघातक्यांची कमी कधी तरी होती काय?

***

९. विश्वासघात, वेढा आणि अब्बक्का राणीची कैद

खुद्द राणी अब्बक्का आपल्या मंगलोरच्या मुख्य ठाण्यावर चाल करून आली, पोर्तुगीज सैन्याला हरवून पळून जायला लावले, ही बाब पोर्तुगीजांच्या दृष्टीने शरमेने मान खाली घालायला लावणारी जशी होती, तशीच धडकी भरवणारी होती.

आपण आता तिच्याशी युद्ध करू शकत नाही; कारण प्रत्येक युद्धात ती आपल्याला परास्त करते, हा अनुभव होता. तेथे पोर्तुगीजांची नाविक आणि सामरिक शक्ती कुचकामी ठरत होती याचे कारण, अब्बक्काचे जगावेगळे युद्धतंत्र, हे आता पोर्तुगीजांच्या चांगलेच लक्षात आलेले होते. तसे पाहिले तर अब्बक्काचे राज्य मोठे नव्हते. तिच्याकडे पोर्तुगीजांसारखी महासागरी भव्य जहाजे नव्हती, प्रचंड तोफखानाही नव्हता.

पण तिच्याकडे जे होते, ते अधिक धोकादायक होते. ते म्हणजे, तिचे स्थानिक भूगोलाचे ज्ञान, समुद्राचे भान, तिच्यावर असलेला लोकांचा अढळ विश्वास, आणि शत्रूवर नवनवीन पद्धतींनी तुटून पडायचे धडाकेबाज कौशल्य. एका स्त्रीने आपल्याला अनेकदा नमवावे हा सल मोठा होता. त्यांनी आजवर उल्लाळवर अनेक हल्ले केले होते. धाडसत्रे झाली होती, व्यापारी जहाजे अडवली गेली, व्यापारात अडथळे आणले गेले; पण अब्बक्का प्रत्येक वेळी वेगळ्या पद्धतीने उभी राहिली, ती कधी किनाऱ्यावरून, कधी नदीमुखातून, तर कधी अरण्यातील वाटांवरून.

बरे, तिचे नेतृत्व झामोरिन, नायक राजे, अरब व्यापारी, कोळी समाज, राज्यातील हिंदू-मुस्लीम-जैन प्रजा या सर्वांनी मान्य केलेले होते. ती आता एका लहान राज्याची राणी राहिली नव्हती, तर अखिल किनारपट्टीवरील राज्यांची नायिका बनलेली होती.

तिचे हेच बळ सर्व शक्तीनिशी तोडायला पाहिजे, हे आता पोर्तुगीजांनी हेरले. आणि हे सरळ युद्धात होऊ शकणार नव्हते. त्यासाठी त्यांनी आता फितुरीचा आधार घ्यायचे ठरवले.

मग त्यांनी कोण फितूर होऊ शकेल, याची चाचपणी करायला सुरुवात केली. कोठे आमिषे, कोठे धमक्या, तर कोठे व्यापारातील सवलती देण्याच्या आश्वासनांची खैरात सुरू केली. अगदी राणी अब्बक्काच्या किल्ल्यातील काही माणसांना जमिनींचे आमिष दाखवत किल्ल्याच्या आतील इत्थंभूत माहिती काढण्याचे प्रयत्न सुरू केले. वर्षानुवर्षं चाललेल्या संघर्षामुळे उल्लाळ थकले नसले, तरी जखमी झालेले होते. व्यापाऱ्यांवर कधी पोर्तुगीजांचा हल्ला येईल, हा अंदाज नसल्याने तेही सावध झालेले होते. त्यांना युद्धे - संघर्ष नको होते. त्यांना सुखाने व्यापार आणि शांततेत धन कमवायचे होते. शेजारचे राजेही आता पोर्तुगीजांच्या आमिषाला बळी पडू लागले होते. खुद्द प्रजेत विविध सामाजिक गटांमध्ये वादाच्या ठिणग्या पाडल्या जाऊ लागल्या होत्या. काहींना स्त्रीचे राज्यच आता खटकू लागले होते. आजवर असे कधी झालेले नव्हते. त्यात आता अब्बक्का उतारवयाकडे झुकत होती.

किल्ल्यांच्या दुरुस्त्या, बंदरांची राखण, पहारे, गुप्तहेर, शेजारी राजांशी संबंध,

व्यापाऱ्यांचा विश्वास, सैन्याचे मनोधैर्य कायम ठेवणेऱ्या साऱ्यांचा भार एकट्या अब्बक्काच्या खांद्यावर होता.

तिच्या चेहऱ्यावर आता तारुण्याचा तेजस्वी उतावळेपणा नव्हता. त्याऐवजी एक थंड, सावध आणि अनुभवी स्थैर्य आले होते. ती अजूनही पहाटेपूर्वी उठे. प्रजेच्या तक्रारी ऐके. पुरेसा धान्यसाठा आणि शस्त्रसाठा असल्याची खात्री करे. गुप्तचरांकडून विविध ठिकाणांवरची त्यांनी आणलेली माहिती घेई. अधिकाऱ्यांना शेती-पाणीपुरवठा आणि बी-बियाण्यांच्या स्थितीला सांभाळण्याबाबत, व्यापारी रस्त्यांच्या देखभालीबद्दल आदेश देई, जैन मुनी आले की त्यांच्याशी तत्त्वचर्चा करे, नौकानिर्मितीची पाहणी करे, शेजारच्या राजांकडून आलेल्या दूतांना भेटे.

थोडक्यात, ती व्यग्र असली, तरी वातावरणात काहीतरी सूक्ष्म बदल होत आहेत याची जाणीव होऊन ती अस्वस्थही होत होती. बाहेरचा शत्रू सहज ओळखता येतो, प्रतिकार करता येतो हे तिला माहित होते पण आतला हसून बोलणारा शत्रू ओळखायचा कसा हे मात्र तिला अद्याप समजले नव्हते, कारण आपल्या प्रजेकडून विश्वासघात होऊ शकेल याची तिने स्वप्नातही कल्पना केली नव्हती आणि आपला माजी पती लक्ष्मप्पा बंगा आरासा पोर्तुगीजांना सामील होऊन आपल्याविरुद्ध काही कट आखायला सक्रिय मदत करेल याची तर तिला अपेक्षाच नव्हती.

लक्ष्मप्पा मध्यंतरीच्या काळात पोर्तुगीजांशी दुरावा ठेवून असला, तरी अब्बक्काच्या वाढत्या कीर्तीमुळे तो असूयाग्रस्त झाला होता. त्यात मंगलोर त्याच्याच राज्यातील बंदर असल्याने त्यावरच अब्बक्काने हल्ला केला, याचे शल्य त्याला होतेच. त्यामुळे तो अलगद पोर्तुगीजांच्या चाचपणीला बळी पडला.

पण याची जाणीव अब्बक्काला नव्हती. एक तर तो बंट समाजातीलच होता...जैन होता...तो पत्नीद्रोह, राष्ट्रद्रोह समाजद्रोह आणि धर्मद्रोह करेल, हे तिच्या गावीही नव्हते. ती नीतिनियमांनी चालणारी एक सभ्य भारतीय महिला होती आणि गोवा आणि मंगलोर येथे गुप्तपणे काय शिजते आहे, याची माहिती तिच्यापर्यंत पोहोचूच दिली जात नव्हती.

त्यामुळे वातावरणात काही बदल होतो आहे याची जाणीव होत असली, तरी नेमके काय शिजते आहे, हे मात्र तिला समजले नव्हते. आपल्याच माणसांवरील विश्वास

तकलादू असू शकतो याची तिला जाणीव नव्हती, असे म्हटले तरी चालेल. असंतोष, लोभ, भीती आणि अहंकार यांचे संगनमत महान लोकांनाही परास्त करते, हा इतिहास तिला माहीत असला, तरी आपल्या राज्यात असे घडू शकेल, असे तिला वाटले नाही, एवढेच!

तिच्याभोवती एक अदृश्य वेढा मात्र आवळला जात होता. हा वेढा बाहेरून हल्ला करण्यासाठी नव्हता. धूर्त पोर्तुगीजांनी अत्यंत काळजी घेऊन, गुप्तता पाळून हा कट रचलेला होता.

त्या दिवशी समुद्रात पोर्तुगीज जहाजांचे नामोनिशाण नव्हते. उल्लाळ बंदरावरचा कारभार नेहमीप्रमाणे शिस्तीत चालला होता. किनारा आणि किल्ला वरकरणी तरी रक्षणात आहे असे वाटत होते.

तो दिवस अब्बक्का राणीने नेहमीच्या कामांच्या व्यापात घालवला. सायंकाळी ती नेहमीप्रमाणे तटावर रक्षणाची व्यवस्था पहायला गेली आणि समुद्रात पाहते तर, पोर्तुगीज जहाजांची अचानक दाटी होऊ लागल्याचे तिला दिसू लागले. तिने स्वत:शीच स्मित केले. हे अनपेक्षित नव्हते.

आजवर पोर्तुगीजांनी असेच अचानक हल्ले केलेले होते. आता हा नवा हल्ला कसा परतवायचा याची ती योजना आखू लागली. भराभर आदेशाच्या फैरी झाडू लागली.

पण का न कळे त्या दिवशी मात्र कोणीही तिच्या आज्ञेचे पालन केले नाही.

संतप्त झालेली अब्बक्का खाली आली. आपल्या राजवाड्यात शिरली आणि अधिकाऱ्यांना पाचारण केले. नौदलाचे अधिकारीही त्यात होते.

अब्बक्काने त्यांना तत्काळ किनारा संरक्षित करून बंदरात उभ्या व्यापारी जहाजांना संरक्षण पुरवण्याचा आदेश दिला.

'जशी आज्ञा...' म्हणून अधिकारी रवाना झाले खरे, पण त्यांनी त्या रात्री तरी काही हालचाल केल्याचे इतिहासात नमूद नाही.

काही वेळातच पोर्तुगीज जहाजे किनाऱ्यावर आली आणि त्यांनी किल्ला आणि उल्लाळ शहरावर तोफांचा भडिमार सुरू केला.

जेही आपल्या बाजूचे सैनिक तिला उपलब्ध झाले, त्यांच्या मदतीने तिने तिखट प्रतिकार सुरु केला. पोर्तुगीज जहाजांवर अग्निबाण सोडायला सुरुवात केली. मंगलोर

किल्ल्यात जिंकलेल्या पोर्तुगीजांच्या तोफांचाही वापर सुरू केला. काही जहाजे पेटली. पण या वेळेस शत्रू जय्यत तयारीत होता.पण शत्रू आता किनाऱ्यावर उतरला होता. अब्बक्काने आपली तलवार उपसली आणि त्यांच्याशी लढायला मोजके सैनिक घेऊन किल्ल्याबाहेर जाऊ लागली.

पण तेवढ्यात किल्ल्याच्या गुप्तद्वारातून पोर्तुगीज सैनिकांची एक तुकडी घुसली. हे द्वार दाखवणारा आणि त्यांना आत येऊ देणारा अब्बक्काचाच विश्वासू पहारेकरी होता. त्यानेच किल्ल्याच्या आतील इत्थंभूत माहिती पोर्तुगीजांना सांगितलेली होती.

तिच्या माजी पतीने उल्लाळचा सारा भूगोल, अब्बक्काच्या युद्धतंत्रातील डावपेच आणि तिच्या स्वभावातील बारकावे सांगितलेले होते.

पोर्तुगीज पथक आत घुसताच तिची सारी व्यूहनीती बदलली. तिला आधी आत घुसलेल्या सैन्याशी लढणे भाग पडले. तिने आपला कडवा संघर्ष सुरू केला. प्रेतांचे खच पडू लागले, पण त्या गुप्तद्वारातून एका मागोमाग एक सैनिकांच्या झुंडी येत होत्या. तोवर किल्ला बाहेरूनही वेढला गेलेला होता. आणि अब्बक्काकडे विश्वासू मनुष्यबळ कमी होते. विश्वासघात झाला आहे हे तिच्या लक्षात आले असले, तरी ती रणमर्दानी त्वेषाने लढत होती. आपला पराभव होणार हे तिच्या लक्षात आलेले होते; पण तिला लढत असताना; मृत्यू हवा होता. ती आडवा येईल त्या पोर्तुगीज सैनिकावर घाव घालत होती. ती रक्ताने चिंब भिजली होती. शरीरावर अनेक जखमाही झाल्या होत्या, पण तिला त्याची पर्वा नव्हती. ती संतापाने बेभान झालेली होती. वेगाने तलवार चालवत होती.

पण थकव्याचे अजून नामोनिशाण नव्हते. तिचे इमानदार सैनिक अजूनही जीवाची बाजी लावून लढत होते, पण त्यांचीही संख्या कमी होत चालली होती आणि शत्रूला तिला जिवंत पकडायचे होते. तिला जिवंत कैद करणे हेच पोर्तुगीजांसाठी अधिक महत्त्वाचे होते.

बेभान युद्ध करताना एका दुर्दैवी क्षणी तिच्या हातातील ढाल फाटली. दुसऱ्या क्षणी एका सैनिकाने तिच्या तलवारीवर झडप घातली. तिसऱ्या क्षणी मागून आणखी दोन सैनिक आले. तेवढ्यातही तिने एका माणसाच्या गळ्यात कट्यार खुपसली.

दुसऱ्याची छाती भेदली...पण त्यांची संख्या मोठी होती. आता किल्ल्याचे दारही उघडले होते. पोर्तुगीज सैन्याचा एक मोठा जथा तेथूनही आत शिरत होता. अखेर तिच्या

भोवतीचे जाळे घट्ट झाले. तिला जमिनीवर दाबण्यात आले. तिचे हात दोराने बांधले गेले, पण ती किंचाळली नाही. दयेची भीक मागितली नाही. ती शिव्या-शापही देत बसली नाही.

ती फक्त एवढेच म्हणाली, 'तुम्ही मला पकडले, माझ्या उल्लाळला नाही.' पोर्तुगीजांनी तिला तातडीने किल्ल्याबाहेर नेले. जहाजात बसवण्यात आले. जहाज तातडीने मंगलोरच्या दिशेने नेले जाऊ लागले. उल्लाळ हतबुद्ध झाले होते. असे काही होईल अशी कल्पनाही त्यांनी केलेली नव्हती. तिला मंगलोरच्या किल्ल्यातील कैदखान्यात ठेवले गेले. तिच्याकडे संपूर्ण राज्याच्या शरणागतीची आणि पोर्तुगीजांचे मांडलिकत्व स्वीकारण्याची मागणी केली गेली.



तिने या दोन्ही मागण्या फेटाळून लावल्या. त्यामुळे तिचा अतोनात छळ सुरू झाला. तिला अन्न-पाणी देण्याचे बंद करण्यात आले. पोर्तुगीज तुरुंग किती भीषण असत, याची कल्पना या एका पोर्तुगीज चित्रकारांनेच काढलेल्या मंगलोरच्या

कैदखान्यावरून लक्षात येईल. अशा अमानुष वागणूक देणाऱ्या तुरुंगात अब्बक्काला किती यातना सहन कराव्या लागल्या असतील याची आपण कल्पनाही करू शकत नाही.

एक तर तिने आपल्या अतुलनीय पराक्रमाने पोर्तुगीजांचा आपण अजिंक्य असल्याचा अहंकार दुखावला होता. त्यांचे हजारो सैनिक ठार मारले होते. अनेक जहाजे जाळून भस्मसात केली होती. मंगलोरचा किल्ला जिंकून घेत पोर्तुगीजांना अपमानास्पदरीत्या पळून जायला भाग पाडले होते. त्यांच्या व्यापारात आडकाठी आणत पर्यायी व्यवस्था करून त्यांना अडचणीत आणले होते.

ते संतापाने बेभान झालेले होते. मग त्यांनी स्वाभिमानी अब्बक्काचा किती छळ केला असेल? पण ती शेवटी अब्बक्का होती. राखेतूनही झेप घेणारी फिनिक्स होती ती. जात्याच बंडखोर होती ती. ती हा छळ निमूटपणे कसा सहन करत राहणार होती?

लोकस्मृती सांगतात की, तिने एका पोर्तुगीज पहारेकऱ्याचा जंबिया तो आपल्याच गुर्मीत बेसावध आहे असे पाहून खेचून घेतला आणि पहिल्यांदा त्याचा गळा कापून त्याला ठार मारले.

स्वत:चे बांधलेले दोर कापून तिने तेथील पहारेकऱ्यांवर बेभान हल्ला चढवला. पहारेकऱ्यांच्या किंचाळ्या ऐकून तलवारी उपसत पोर्तुगीज सैनिक कैदखान्यात धावले. अब्बक्का उपासमारीने अशक्त असली, जखमी असली, तरी ती अजूनही बेभानपणे लढत होती.

पण तिच्याकडे होता फक्त जंबिया... तरीही ती तलवारी घेतलेल्या सैनिकांवर तुटून पडली. अनेकांचे प्राण घेतले, पण एक घाव तिच्यावर झाला आणि स्वातंत्र्याची धगधगती मशाल विझून कोसळून पडली.

राणी अब्बक्का कैदेतही बंड करून शत्रूला मारता मारता मेली. एक आख्यायिका जन्माला आली. ही परकीय सत्तेशी यशस्वी संघर्ष करणारी आणि मृत्यूपर्यंत लढत राहिलेली प्रेरणादायी स्मारक बनली.

एक निर्भय, जाज्वल्य स्वातंत्र्यनिष्ठा असणारी, जगावेगळ्या युद्धतंत्राचा यशस्वी वापर करणारी, प्रजेवर नितांत प्रेम करणारी ही इतिहासातील महानायिका.

संपूर्ण देश आद्य स्वातंत्र्यसेनानी राणी अब्बक्काशी नेहमीच कृतज्ञ राहील!

***

–संदर्भ ग्रंथसूची –

1. Rani Abbakka : The Queen of Ullal Who Stood Up to the Might of the Portuguese, by Anant Pai, India Book House Education Trust, 1980.
2. The Teenage Diary of Abbakka : The Warrior Queen of South India By Mandana, Kavitha, Talking Cub, 2021.
3. Comprehensive Seminar Volume on Ullala Rani Abbakka, Veerarani Abbakka Utsava Samiti (ed.) Mangaluru/Ullal local publication, 2011,
4. Research Paper on Rani Abbakka, by Mishra Kailash IGNCA-associated study.2020.
5. A Concise History of Karnataka. By Kamath, Suryanath U. 2001.)
6. Dakshina Kannada / South Kanara District Gazetteer. Karnataka Gazetteer Department.
7. Portuguese India / Estado da Índia essay collections (esp. edited volumes by K. S. Mathew / K. M. Mathew)
8. THE SALT-STAINED CROWN Abbakka and the Rani of Sovereignty by Prof. (Dr) Partha Pratim Das 2025.
9. 'Queen Abbakka's triumph over western colonies". Press Information Bureau, Govt. of India. Retrieved 25 July 2007.
10. 'The intrepid Queen-Rani Abbakka Devi of Ullal' Archived from the original on 7 August 2007 Retrieved on 09/04/2025.
11. 'Freedom Fighter of the Coast,RANI Abbakka,Wordpress. 1 July 2007.
12. P.B. Desai (1970). Cultural History of Karnataka. Karnatak University.
13. S. Chandni (2018). Medieval Karnataka. University Press, pp.156–158.
14. Kumar Mishra, Kailash (January 2002). Abbakka Rani a; The Unsung Warrior Queen, Indira Gandhi National Centre for the Arts.

***